शनिवार, १८ जून २०२२
• वर्ष १४ • अंक ३३१
www.ramprahar.com
# राम प्रहर
• पाने ८ • किंमत ₹ २ • रायगड

## अंतरंग

‘विधान परिषदेतही भाजपला यश मिळेल’/२
जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात काँग्रेसचा धुडगुस/७
यशस्वी जैस्वालची ऐतिहासिक कामगिरी/८

## राज्यसेवा पूर्व परीक्षा अर्जांसाठी मुदतवाढ

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगातर्फे (एमपीएससी) पदभरती परीक्षांसाठी कमाल संधींची मर्यादा रद्द करण्यात आली. त्यामुळे राज्यसेवा पूर्व परीक्षा २०२२साठी अर्ज सादर करू इच्छिणाऱ्या उमेदवारांना संधी देण्यासाठी एमपीएससीने २४ जूनपर्यंत मुदतवाढ दिली आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) धर्तीवर एमपीएससीने पदभरती परीक्षांसाठी कमाल संधींची मर्यादा लागू करण्याचा निर्णय दोन वर्षांपूर्वी घेतला होता, मात्र काही दिवसांपूर्वी या निर्णयात फेरबदल करून प्रवर्गासाठी निश्चित केलेल्या वयोमर्यादेनुसार परीक्षा देण्याबाबतचा निर्णय लागू करण्यात आला, परंतु एमपीएससीच्या कमाल संधी मर्यादेच्या नियमामुळे राज्य सेवा पूर्व परीक्षा २०२२साठी काही उमेदवारांना अर्ज सादर करता आला नसल्याची शक्यता आहे. त्यामुळे त्यास मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला गेला आहे.

# २४ जून रोजी सिडको घेराव आंदोलन होणारच

### लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समिती सज्ज



(छाया : लक्ष्मण ठाकूर)

**पनवेल : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे तसेच प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यात याव्यात यासाठी लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने ‘दिबां’च्या स्मृतिदिनी म्हणजेच २४ जूनला सिडकोला घेराव आंदोलन होणारच. आमचा धडक मोर्चा काही हजारोंच्या संख्येने असणार असल्याने राज्य सरकारला त्याची नोंद घ्यावीच लागेल, असा इशारा पत्रकार परिषदेत देण्यात आला.

‘दिबां’च्या स्मृतिदिनी होणाऱ्या आंदोलनाची माहिती देण्यासाठी सर्वपक्षीय कृती समितीतर्फे आगरी समाज मंडळाच्या पनवेल येथील सभागृहात शुक्रवारी (दि. १७) पत्रकार परिषद घेण्यात आली. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष दशरथ पाटील होते. (पान २ वर..)



“ नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी तसेच स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यात याव्यात यासाठी समिती स्थापन झाली, त्या वेळी आमच्यासोबत असलेले काही नेते प्रकल्पग्रस्तांचा साडेबारा टक्के व गावठाणाचा प्रश्न सोडवला असे सांगतात. तसे झाले असेल तर चांगलेच आहे, पण त्याबाबत कोणताही पुरावा देत नाहीत. त्यामुळे आम्ही सिडकोवर २४ तारखेला धडक मोर्चा हजारोंच्या संख्येने नेणारच. आता हे आंदोलन पेटणार.

**—लोकनेते रामशेठ ठाकूर,**
उपाध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती




“ आम्ही २४ तारखेला आंदोलन करणारच असा आमच्या बैठकीत निर्णय झाला आहे. मागच्या वेळी आम्हाला पोलिसांनी नवी मुंबई महापालिकेच्या कार्यालयाजवळ अडवले. पुढे जाऊन दिले नाही. या वेळी आम्ही बेलापूर गावातून मोर्चाने धडकणार आहोत. त्याची तयारी सुरू आहे. अनेक गावांत बैठका सुरू आहेत. या वेळीही हजारोंच्या संख्येने लोक सहभागी होणार आहेत.

**—आमदार प्रशांत ठाकूर,**
कार्याध्यक्ष, सर्वपक्षीय कृती समिती

# दहावीतही कोकण विभाग अव्वल

### राज्याचा निकाल ९६.९४%; मुलींची बाजी



(छाया : नितीन शेडगे)

**पुणे : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाद्वारे घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी (दि. १७) जाहीर झाला. यात एकूण ९६.९४ टक्के विद्यार्थ्यांनी यश मिळवले आहे. बारावीप्रमाणेच दहावीच्या निकालातही कोकण विभाग अव्वल ठरला असून मुलींनी बाजी मारली आहे.

राज्यभरात एकूण १५,६८,९७७ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यापैकी १५,२१,००३ लाख विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. राज्यात एकूण १२२ विद्यार्थ्यांना १०० टक्के गुण मिळाले असून ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण असलेल्या विद्यार्थ्यांची संख्या ८३,०६० इतकी आहे. २४ विषयांचा १०० टक्के निकाल लागला आहे, तर तब्बल १२,२१० शाळांचा निकाल १०० टक्के लागला.

ऑनलाइन निकालानंतर गुणपडताळणी, उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रती, पुनर्मूल्यांकन व स्थलांतर प्रमाणपत्रासाठी ऑनलाइन अर्ज स्वीकारण्यात येतील. याबाबतची सविस्तर माहिती, अटी, शर्ती http://verification.mh-ssc.ac.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे शिक्षण मंडळाद्वारे कळविण्यात आले आहे.

**विभागनिहाय टक्केवारी**

- **कोकण : ९९.२७**
- **कोल्हापूर : ९८.५०**
- **लातूर : ९७.२७**
- **नागपूर : ९७**
- **मुंबई : ९६.९४**
- **अमरावती : ९६.८१**
- **औरंगाबाद : ९६.३३**
- **पुणे : ९६.९६**
- **नाशिक : ९५.९०**

### मुंबई विभागात रायगड सरस

**अलिबाग** : दहावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९७.३५ टक्के लागला आहे. रायगडने मुंबई विभागात अव्वल येण्याचा मान मिळविला. बारावीच्या परीक्षेतही रायगडने मुंबई विभागात प्रथम क्रमांक पटकाविला होता. जिल्ह्यात म्हसळा तालुक्याचा सर्वाधिक ९९.०२ टक्के निकाल लागला आहे. (पान ५ वर..)

### सीकेटी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

**पनवेल** : दहावीच्या परीक्षेत जनार्दन भगत शिक्षण प्रसारक (जेबीएसपी) संस्थेचे नवीन पनवेल येथील सीकेटी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, खारघर ओवेपेठ येथील न्यू इंग्लिश स्कूल, गव्हाण–कोपर येथील मोरू नारायण म्हात्रे व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेज तसेच रयत शिक्षण संस्थेच्या कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजचा निकाल १०० टक्के लागला आहे. याबद्दल ‘रयत’चे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य तथा ‘जेबीएसपी’चे चेअरमन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. (पान २ वर..)

## निवडक

### सोनिया गांधी यांच्या श्वासनलिकेत कोरोना संक्रमण

**नवी दिल्ली** : काँग्रेस अध्यक्ष सोनिया गांधी यांच्या श्वासनलिकेमध्ये कोरोनाचे गंभीर संक्रमण झाले आहे. गेल्या काही दिवसांपासून त्या दिल्लीच्या गंगाराम रुग्णालयात उपचार घेत आहेत. सोनिया यांच्या नाकातून काही दिवसांपूर्वी रक्तस्राव होत होता. गुरुवारी त्यांना श्वास घेण्यास त्रास जाणवू लागला. तपासणीवेळी त्यांच्या श्वासनलिकेला फंगल इन्फेक्शन असल्याचे समजले. त्यांना अन्य प्रकारचेदेखील त्रास होत आहेत. त्यांच्या प्रकृतीवर रुग्णालयाचे डॉक्टर लक्ष ठेवून आहेत.

### राज्यात सलग तिसऱ्या दिवशी रुग्णसंख्या चार हजार पार

**मुंबई** : राज्यात कोरोनाचा कहर सातत्याने कायम आहे. राज्यात शुक्रवारी (दि. १७) चार हजार १६५ जणांना कोरोनाचे निदान झाले, तर दिवसभरात तीन जणांचा मृत्यू झाला आहे. राज्यात ताज्या आकडेवारीनुसार २१ हजार ७४९ सक्रिय रुग्ण आहेत. या रुग्णांवर आरोग्य यंत्रणा लक्ष ठेवून आहे.

## विधान परिषद निवडणुकीमध्ये महाविकास आघाडीला धक्का

### देशमुख, मलिकांना मतदान करण्यास न्यायालयाने परवानगी नाकारली





**मुंबई : प्रतिनिधी**

महाविकास आघाडी सरकारला मुंबई उच्च न्यायालयाकडून मोठा धक्का बसला आहे. राष्ट्रवादीचे नेते व माजी गृहमंत्री अनिल देशमुख आणि मंत्री नवाब मलिक यांना आगामी विधान परिषद निवडणुकीत मतदान करण्यास न्यायालयाने परवानगी नाकारली आहे.

विधान परिषद निवडणुकीसाठी मतदान करू देण्याची अनिल देशमुख आणि नवाब मलिक यांची मागणी शुक्रवारी (दि. १७) उच्च न्यायालयाने फेटाळली. मतदानासाठी काही तास विधानभवनात जाऊ देण्याची परवानगी त्यांनी मागितली होती, मात्र त्यास कोर्टाने नकार दिला.

येत्या २० जून रोजी होणाऱ्या विधान परिषदेच्या निवडणुकीत तरी मतदान करता यावे यासाठी देशमुख–मलिक यांनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. विधान परिषदेच्या १० जागांसाठी २० जून रोजी निवडणूक होणार आहे. त्यात मतदान करता यावे यासाठी बंधपत्रावर एक दिवसाचा जामीन मंजूर करण्याची मागणी देशमुख–मलिक यांनी याचिकेद्वारे केली होती, पण त्यांच्या पदरी निराशा आली.

याआधी राज्यसभा निवडणुकीत देशमुख आणि मलिक यांना मतदान करता आले नव्हते. त्या वेळीदेखील त्यांनी न्यायालयाचे दरवाजे ठोठावले होते, मात्र न्यायालयाने त्यांना मतदान करण्यास मज्जाव केला. आताही हायकोर्टाने त्यांना धक्का दिला आहे.



## आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीत भाजप घवघवीत यश मिळवेल

- **लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विश्वास**
- **कळंबोलीत विकासकामांचा शुभारंभ**

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

येणाऱ्या पनवेल महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष घवघवीत यश संपादित करेल, असा विश्वास माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी गुरुवारी (दि. १६) कळंबोली येथे व्यक्त केला. नगरसेवक अमर पाटील यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून विविध विकासकामांचा शुभारंभ लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते आणि भाजप उत्तर रायगड जिल्हा अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत झाला. त्या वेळी ते बोलत होते.

कळंबोली सेक्टर १०मधील आई माता मंदिरात झालेल्या या समारंभाला महापौर डॉ. कविता चौतमोल, सभागृह नेते परेश ठाकूर, प्रभाग समिती सभापती प्रमिला पाटील, नगरसेवक बबन मुकादम, राजेंद्र शर्मा, विकास घरत, नगरसेविका मोनिका महानवर, भाजप शहराध्यक्ष रविनाथ पाटील, जिल्हा सरचिटणीस अशोक मोटे, युवा मोर्चा उत्तर जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर, अमर ठाकूर, जमीर शेख, प्रियंका पवार, प्रिया मुकादम, पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा विशेष सत्कार करण्यात आला. (पान २ वर..)

## ‘अग्निपथ’ : हवाई दलामध्ये २४ जूनपासून भरती प्रक्रिया

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

लष्करातील ‘अग्निपथ’ या नव्या भरती योजनेंतर्गत हवाई दलातील भरती प्रक्रिया २४ जूनपासून सुरू होणार आहे. एअर चीफ मार्शल व्हीआर चौधरी यांनी ही माहिती दिली.



एअर चीफ मार्शल चौधरी पुढे म्हणाले की, भारत सरकारने अग्निपथ योजना जाहीर केली आहे, ज्या अंतर्गत सशस्त्र दलात तरुणांची भरती केली जाऊ शकते. मला कळविण्यात आनंद होत आहे की, पहिल्या भरतीसाठी तरुणांची कमाल वयोमर्यादा २३ वर्षे करण्यात आली आहे. त्यामुळे मोठ्या संख्येने तरुण या भरतीसाठी अर्ज करतील.

दरम्यान, केंद्र सरकारच्या या योजनेबाबत लष्करप्रमुख जनरल मनोज पांडे यांनी सांगितले की, कोविड–१९ महामारीमुळे गेली दोन वर्षे भरती योजना थांबवण्यात आली होती. आता इच्छुक तरुणांनी ‘अग्निवीर’ म्हणून लष्करात दाखल होण्याच्या संधीचा लाभ घ्यावा.

## पेण खारेपाटात समुद्राच्या उधाणाने दाणादाण!

### १०० एकर जमीन पाण्याखाली; पेरणी केलेले बियाणे वाया

**पेण : प्रतिनिधी**

पेण तालुक्यातील खारेपाटात शिर्की ग्रामपंचायत क्षेत्रातील शिर्की चाळ नंबर–१ येथील खारभूमी संरक्षक बंधाऱ्यांशी निगडीत शेती व खाडीच्या मुखाशी असलेल्या उघाडीचे दरवाजे उधाणाच्या भरतीत तुटले. त्यामुळे समुद्राचे खारे पाणी परिसरातील १०० एकर पेरणी केलेल्या भातशेतीत शिरून शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. याबाबत येथील शेतकऱ्यांनी पेण तहसीलदार कार्यालयात जाऊन माहिती दिली व झालेल्या नुकसानीचे पंचनामे करून मदत मिळावी, अशी मागणी केली आहे.



(छाया : अनिस मनियार)

शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार खारभूमी विभागाच्या शिर्कीचाळ नंबर १ व २ या परिसरात शेती असून येथे लोकवस्तीही आहे. शेती संरक्षक बंधारे व खाडीच्या मुखावर असलेल्या उघाडीचे काम गेल्या दोन महिन्यांपासून केले आहे. समुद्रात मोठी उधाण भरती आल्याने या खाडीप्रवण क्षेत्रात पाण्याची पातळी वाढली. त्यानंतर बरोबर उघाडीचे दोन दरवाजे तूटून परिसरातील १०० एकर पेरणी केलेली भातशेती शेताच्या बांधापर्यंत पाणी तुडूंब भरले. पाण्याचा प्रवाह जोरदार असल्याने वेगवान प्रवाहाने शेतजमीनीत पाणी भरून पेरणी केलेले बी–बियाणे नष्ट झाले आहे.

तालुका कृषी विभागाचे अधिकारी योगेश पवार याची शिर्कीचाळ येथे जाऊन पाहणी केली. दरम्यान, शिर्कीचाळ येथील शेतकऱ्यांवर आलेल्या संकटाची माहिती प्रांत अधिकारी, तहसीलदार यांनाही देण्यात आली आहे. याबाबत सखोल माहिती घेऊन नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरीवर्गातून होत आहे.

### तिहेरी हत्याकांडाने सातारा हादरले

## महिलेची हत्या करून दोन मुलांना विहिरीत ढकलले

**सातारा : प्रतिनिधी**

साताऱ्यातील कोरेगाव तालुक्यात वेलंग शिरंबे या गावात अनैतिक संबंधातून महिलेसह तिच्या दोन मुलांचा निर्घृण खून करण्यात आला आहे. आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे.

योगिता नामदास नावाची महिला आपल्या दोन मुलांसह तिचा प्रियकर दत्ता नामदास याच्यासोबत राहत होती. या महिलेचा मृतदेह घरात संशयित अवस्थेत आढळून आला आहे. पोलिसांना या घटनेचा तपास सुरू केल्यानंतर घराच्या बाजूलाच असलेल्या विहिरीत या महिलेच्या दोन्ही मुलांचेही मृतदेह आढळून आले.

तिहेरी हत्याकांडानंतर रहिमतपूर पोलिसांनी वेगाने तपासाची चक्रे फिरवून योगिता नामदासचा प्रियकर दत्ता नामदास याला ताब्यात घेतले. त्यानंतर ही घटना अनैतिक संबंधातून झाल्याचे समोर आले.

आरोपी दत्ता नामदास याने पहिल्यांदा योगिता हीचा घरात गळा दाबून खून केला आणि त्यानंतर तिच्या दोन मुलांना विहिरीत ढकलून त्यांनादेखील संपवले. मृत योगिताची दोन्ही मुले ही पहिल्या पतीपासून झाली होती. योगिताने नवऱ्याला सोडले होते आणि वेलंग शिरंबे या गावात दत्ता नामदास या प्रियकरासोबत त्याचे नाव लावून राहत होती. आरोपी दत्ता नामदासला पोलिसांनी अटक केली असून अधिक तपास सुरू आहे.

# ‘भ्रष्टाचाराचे आरोप असणाऱ्या नेत्यांच्या बचावासाठी काँग्रेसचे नौटंकी आंदोलन’

**मुंबई : प्रतिनिधी**

मराठा आरक्षण, ओबीसी आरक्षण, एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलन, शेतकऱ्यांना अपुरी मदत, शेतकऱ्यांची वीज तोडणी यासारख्या ज्वलंत प्रश्नांवर आंदोलन करण्याऐवजी काँग्रेस कार्यकर्ते गांधी परिवाराच्या बचावासाठी मैदानात उतरले आहेत. भ्रष्टाचाराचे आरोप असलेल्या गांधी परिवारासाठी काँग्रेसचे मुठभर कार्यकर्ते नौटंकी आंदोलन करत जनतेला वेठीस धरत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी केले. राज्य सरकारचे जनतेला वेठीस धरण्याचे प्रयत्न हाणून पाडून जनतेच्या सुरक्षिततेची हमी द्यावी, असेही ते म्हणाले. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



उपाध्ये म्हणाले की, नॅशनल हेराल्ड भ्रष्टाचार प्रकरणी न्यायालयाच्या आदेशानुसार राहुल गांधी यांच्या विरोधातील ईडी चौकशीत अडथळे आणून चौकशीवर दबाव आणण्यासाठी देशाला वेठीस धरून हिंसक आणि बेकायदा आंदोलन करण्याचा काँग्रेसचा कट असल्याचे स्पष्टपणे दिसून येते. महाराष्ट्रातही काँग्रेसच्या मूठभर कार्यकर्त्यांनी राजभवनसह अन्य ठिकाणी निदर्शने केल्याने महाराष्ट्रातही जनतेला वेठीस धरण्याचे प्रयत्न होत आहेत.

असोसिएटेड जर्नल लिमिटेड या कंपनीची दोन हजार कोटींची मालमत्ता कवडीमोल किंमतीत हडपल्याच्या प्रकरणी राहुल गांधींची चौकशी करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतर ‘ईडी’कडून सुरू झालेल्या चौकशी विरोधात सत्याग्रहाचा कांगावा करून देशातील कायदा सुव्यवस्था स्थिती धोक्यात आणण्याचे षडयंत्र काँग्रेसकडून रचले जात आहे. त्याचाच भाग म्हणून महाराष्ट्रात काँग्रेसची निदर्शने सुरू आहेत. काही राज्यांत काँग्रेस कार्यकर्त्यांनी पोलिसांनाच लक्ष्य केले, तर काही ठिकाणी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेची कोंडी करून जनतेलाच वेठीस धरले, असेही उपाध्ये यांनी सांगितले.

**काँग्रेसला जनताच उत्तर देईल!**

पक्षश्रेष्ठींवरील निष्ठा नोंदविण्यासाठी आंदोलनात उतरलेल्या नेत्यांनी आपली विवेकबुद्धी हरवल्याचे सिद्ध केले असून देशात अराजक माजविण्याच्या कटात सहभागी झाल्याने त्यांनी आपली उरलीसुरली विश्वासार्हतादेखील गमावली आहे. भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्याकरिता सुरू असलेल्या या आंदोलनाच्या निमित्ताने सामान्य जनतेला आणि सुरक्षा यंत्रणांना वेठीस धरून दबाव आणण्याचा प्रयत्न जनताच हाणून पाडेल व काँग्रेसच्या विसर्जनाचा मार्ग मोकळा करून देईल, असा टोलाही उपाध्ये यांनी लगावला आहे.

# ‘रानसई’तील पाणीसाठा संपुष्टात

## डेडस्टॉकमधून करावा लागणार पाणीपुरवठा



**उरण : प्रतिनिधी**

उरण परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या रानसई धरणातील पाण्याचा साठा संपुष्टात आला आहे. त्यामुळे धरणात आता १५ दिवस पुरेल इतकाच पाण्याचा साठा उरला आहे. त्यामुळे याआधीच पाणी टंचाईची झळ सोसणाऱ्या दिड लाख संख्येच्या उरणकरांना गुरुवारी रात्रीपासूनच धरणातील डेड स्टॉकमधून पाणीपुरवठा करण्याची वेळ एमआयडीसीवर येऊन ठेपली आहे.

दिड लाख लोकसंख्येच्या उरणकरांची तहान भागविण्यासाठी तालुक्यातील रानसई एकमेव धरण आहे. महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारीत असलेल्या या रानसई धरणातूनच उरण तालुक्यातील ३७ ग्रामपंचायती, उरण नगरपरिषद आणि परिसरातील काही औद्योगिक कंपन्यांना पाणीपुरवठा केला जातो. मात्र यावर्षी रानसई धरणाची पाणीपातळी खालावली. त्यातच जुनचे १५ दिवस उलटून गेल्यानंतरही पाऊस बरसला नाही. पावसाने दडी मारल्याने रानसई धरणातील पाण्याचा साठा काल संपुष्टात आला आहे. त्यामुळे उरण शहर आणि ३५ ग्रामपंचायतींना धरणातील डेड स्टॉकमधुन पाणीपुरवठा करण्याची वेळ एमआयडीसीवर येऊन ठेपली आहे. धरणाच्या डेड स्टॉकमध्येही ३० जुन २०२२पर्यंतच पुरेल इतकाच पाण्याचा साठा उरला आहे. याआधीच पाणी टंचाईचा सामना करण्यासाठी आठवड्यातील एका शुक्रवारी पाणी कपात केली आहे.

**नागरिकांनी पाणी जपून वापरावे**

**पावसाने दडी मारल्याने धरणातील पाणीसाठा संपुष्टात आला आहे. धरणातील डेड स्टॉकमधून पाणीपुरवठा करण्याची वेळ आली आहे. नागरिकांनी पाणी वाया न घालविता पाण्याचा जपून वापर करावा.**

**–रवींद्र चौधरी,**
**एमआयडीसी उपअभियंता, उरण**

# युईएस इंग्लिश मीडियम स्कूलचा दहावीचा निकाल ९९.४६ टक्के

**उरण : वार्ताहर**

या वर्षी जाहीर झालेल्या १०वी च्या निकालात यु. ई .एस. इंग्लिश मिडियम स्कूलचा ९९.४६ टक्के निकाल लागला असून कनिष्का गिरीष पाटील हिने ९४.८० टक्के मिळवून प्रथम क्रमांक, यश जितेंद्र म्हात्रे, गायत्री रविंद्र घोलप आणि शिवांगी नानासाहेब डांगे या तिघांनीही ९३ टक्के मिळवून द्वितीय क्रमांक मिळविला.

संस्कृती नरेंद्र ठाकूर हिने ९१.४० टक्के मिळवून तृतीय क्रमांक मिळविला. तसेच स्नेहद कुंदन पानसरे व सिंपल श्रीकांत डोगरा या दोघांनीही ९१ टक्के मिळवून चौथा क्रमांक व वेदांत विजय रावते याने ९०.८० टक्के मिळवून पाचवा क्रमांक मिळविला आहे.

यु.ई.एस.च्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांवर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे.या यशात विद्यार्थ्यांबरोबर त्यांचे आईवडिल, शिक्षक तसेच यु .ई. एस.स्कूल कमिटी मेंबर्स, स्कूल व ज्युनिअर कॉलेजच्या प्राचार्या, माध्यमिक विभागाच्या सुपरवायझर या सर्वांचाही सहभाग आहे. यु.ई. एस. च्या कमिटी मेंबर्सकडून गुणवान व यशस्वी विद्यार्थ्यांसाठी मेहनत घेणाऱ्या सर्व शिक्षकांचे कौतुक केले जात आहे.



**मुंबई : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारला आठ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने भाजप प्रदेश माध्यम विभागातर्फे तयार करण्यात आलेल्या ‘परिवर्तनाची आठ वर्षे’ या पुस्तिकेचे गुरुवारी विधानसभा विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस व प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. राष्ट्रीय महासचिव विनोद तावडे, प्रदेश सरचिटणीस आमदार चंद्रशेखर बावनकुळे, प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय, भाजप नेते आमदार आशीष शेलार, मुख्य प्रवक्ते केशव उपाध्ये आदी या वेळी उपस्थित होते.**

# विधान परिषद निवडणुकीतही भाजपला यश मिळेल

## प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांचा विश्वास

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे विधान परिषद निवडणुकीसाठी नियोजन पूर्ण झाले असून राज्यसभा निवडणुकीप्रमाणेच या निवडणुकीतही भाजपला यश मिळेल आणि पक्षाचे सर्व पाच उमेदवार विजयी होतील, असा विश्वास प्रदेशाध्यक्ष चंद्रकांत पाटील यांनी गुरुवारी (दि. १७) व्यक्त केला. ते मुंबईत भाजप प्रदेश कार्यालयात पत्रकारांशी बोलत होते. या वेळी प्रदेश उपाध्यक्ष राम शिंदे आणि प्रदेश सरचिटणीस श्रीकांत भारतीय उपस्थित होते.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, विरोधी पक्षनेते देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राज्यसभा निवडणुकीत विजय मिळविल्याने राजकीय भूकंप झाला. तसाच आताही होईल. विजयाचा गुलाल भाजपच उधळेल. देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या कालावधीत पाच वर्षे मुख्यमंत्री असताना आमदारांना आपुलकीची वागणूक दिली. त्याचे रुपांतर विधान परिषद निवडणुकीत मतांमध्ये होईल.

एका प्रश्नाच्या उत्तरात ते म्हणाले की, देहू येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शिळा मंदिराचे उद्घाटन केल्यानंतर वारकऱ्यांच्या मेळाव्यात संवाद साधला. त्यावेळी सूत्रसंचालकाने त्यांना भाषण करण्यासाठी विनंती केली असता मोदी यांनी शेजारी बसलेल्या अजित पवार यांना सांगितले की, त्यांनी आधी बोलले पाहिजे, परंतु आपण भाषण करणार नाही, असे आपण आधीच सांगितले असल्याचा खुलासा अजित पवार यांनी केला.

आपण व्यासपीठावर शेजारी असल्याने हा संवाद ऐकायला मिळाला. त्यामुळे अजित पवार यांचे देहूच्या कार्यक्रमात भाषण झाले नाही. याविषयी अनावश्यक वाद निर्माण केला गेला आहे. सामान्यांना यातील राजकारण कळते. प्रत्येक विषयात राजकारण करू नये.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांची ईडीकडून चौकशी होत असल्याने त्याला विरोध करण्यासाठी काँग्रेस पक्षातर्फे चालू असलेले आंदोलन म्हणजे संविधानाचा अवमान आहे.स्वायत्त तपास यंत्रणा संविधानाच्या चौकटीत काम करत असताना त्याला विरोध करणे योग्य नाही, असेही ते या वेळी पाटील बोलताना म्हणाले.

## पान १ वरून

पान १ वरून

### सीकेटी विद्यालयाचा १०० टक्के निकाल

सीकेटी विद्यालयात ९३.८० टक्के मिळवित प्राची बोरडे हिने प्रथम, ९२ टक्के गुण प्राप्त करीत अथर्व नावडेकर व धनराज मोरे यांनी द्वितीय आणि ९०.६० टक्के मिळवित सिद्धार्थ जाधव याने तृतीय क्रमांक पटकाविला आहे. मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनियर कॉलेजमध्ये प्रेम मुंबईकर याने ८८.८० टक्के गुण प्राप्त करीत प्रथम, मृदुला पाटील हिने ८७.६० टक्के मिळवित द्वितीय आणि परी गुप्ता हिने ८७.२० टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक पटकाविला. न्यू इंग्लिश स्कूलमध्ये कस्तुरी वासकर हिने ८६.८० टक्के मिळवित प्रथम, प्रचिती घरत हिने ८५.२० टक्के गुण मिळवित द्वितीय आणि एकता भाग्यवंत व रवी विश्वकर्मा यांनी ८०.८० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजमध्ये रिया चिमणे हिने ९३.८० टक्के मिळवित प्रथम, स्मृती पात्रो हिने ९३.६० गुण मिळवित द्वितीय आणि सुयश पवार व सिद्धी टिके यांनी ९२ टक्के गुण मिळवित तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व जनार्दन आत्माराम भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये शशिकांत चौगुले याने ९१.८० टक्के मिळवित प्रथम, सानिया अन्सारी व सिद्धी घरत यांनी ९०.२० टक्के गुण मिळवित द्वितीय आणि प्रणिता भोसले हिने ९० टक्के गुण प्राप्त करून तृतीय क्रमांक पटकाविला आहे.

### २४ जून रोजी सिडको घेराव आंदोलन होणारच!

याचबरोबर उपाध्यक्ष माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, कार्याध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, सहचिटणीस गुलाब वझे, राजेश गायकर, संतोष केणे, सुरेश पाटील, दीपक म्हात्रे, खजिनदार जे. डी. तांडेल, दीपक पाटील, विनोद म्हात्रे, गोपीनाथ म्हात्रे, अरुण पाटील, दशरथ भगत, डॉ. राजेश पाटील, उपमहापौर सीताताई पाटील, नगरसेवक विकास घरत तसेच नंदू ठाकूर, शैलेश घाग, विनोद म्हात्रे, सीमा घरत आदी उपस्थित होते.

लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीने गेल्या वर्षी नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे तसेच स्थानिक प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित समस्या सोडविण्यात याव्यात यासाठी २४ जूनला आंदोलन केले होते. त्या वेळी पोलिसांनी आंदोलनकर्त्यांना सिडकोच्या कार्यालयाजवळ जाऊ न देता नवी मुंबई महापालिकेजवळ मोर्चा अडवला होता. त्यानंतरही आमच्या मागण्या मंजूर केल्या गेल्या नाहीत. सिडकोने केलेला ठराव रद्द केला नाही. जोपर्यंत विधिमंडळात लोकनेते दिवंगत दि. बा. पाटील यांचे नाव देण्याचा ठराव मंजूर केला जात नाही, तोपर्यंत आमचे आंदोलन सुरू राहील, असा निर्धार या वेळी समितीच्या नेत्यांनी व्यक्त केला. या वेळी काँग्रेसच्या नेत्यांनी दिवंगत लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव विमानतळाला देण्याच्या मागणीला पाठिंबा दिला आणि त्यांनी आंदोलनात सहभागी होणार असल्याचे सांगितल्याने याबद्दल त्यांचे आभार मानण्यात आले.

पोलिसांनी आंदोलकांना मागील आंदोलनाबाबत आता वर्षाने नोटिसा दिल्या आहेत. त्याला आम्ही घाबरत नाही. आमचे आंदोलन सुरूच राहील. कितीही नोटिसा दिल्या तरी थांबणार नाही, असे या वेळी स्पष्ट करण्यात आले. लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर, माजी खासदार संजीव नाईक, गुलाब वझे, जे. डी. तांडेल यांनीही आपली भूमिका मांडली. कल्याण व ठाण्याहून आलेल्या कार्यकर्त्यांनीही आम्ही आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होणार असल्याचे सांगितले.

### आगामी पनवेल महानगरपालिका निवडणुकीत भाजप घवघवीत यश मिळवेल

या वेळी नगरसेविका मोनिका महानवर व अशोक मोटे यांच्या प्रयत्नाने सेक्टर ५ प्लॉट नंबर १९ ’अ’मधील नव्याने उद्यान सुशोभीकरण करणे, प्लॉट नंबर ३मधील मैदान सुशोभीकरण करणे या दोन कोटी ३४ लाख रुपयांच्या कामाचे, नगरसेवक बबन मुकादम व नगरसेविका राणी कोठारी यांच्या प्रयत्नातून सेक्टर २ प्लॉट नंबर ११ ‘अ’मध्ये नव्याने उद्यान सुशोभीकरण करणे या एक कोटी ३९ लाख रुपयांचा कामाचे भूमिपूजन करण्यात आले. त्याचप्रमाणे नगरसेवक अमर पाटील यांच्या १४ लाख रुपयांच्या नगरसेवक निधीतून कळंबोली सेक्टर १०मधील ए–१ ते ए–५ सोसायटी, सेक्टर ८ यश कॉम्प्लेक्समध्ये स्टॅम्प काँक्रिटीकरण तसेच चार लाख रुपयांच्या नगरसेवक निधीतून सेक्टर ८ ते २०मधील सोसायट्यांसमोर बेंचेस बसवण्याच्या कामाचे आणि सेक्टर १०मध्ये स्वखर्चातून ज्येष्ठ नागरिकांसाठी साकारण्यात आलेल्या वाचनालयाचा शुभारंभही या सोहळ्यात करण्यात आला.

आपल्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर म्हणाले की, आज अनेक कोटी रुपयांच्या विकासकामांचे लोकार्पण व भूमिपूजन होत आहे. हे फक्त कळंबोलीपर्यंत मर्यादित असून संपूर्ण महापालिका क्षेत्रात शेकडो कोटींची कामे सुरू आहेत. आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल महापालिकेसाठी आग्रह धरला. त्यास अनेकांनी विरोध केला, मात्र आज होत असलेली विकासाची कामे पाहता महापालिका होणे किती महत्त्वाचे होते हे लक्षात येत आहे. भाजपचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते एकजीव होऊन काम करीत आहेत. त्यामुळे येणाऱ्या महापालिका निवडणुकीत भारतीय जनता पक्ष घवघवीत यश संपादित करेल. त्यांनी पुढे बोलताना सर्वांनी एकत्र येऊन काम केल्यास या पाच वर्षांत जी विकासाची कामे झाली त्यापेक्षा अधिक विकासाची कामे येत्या पाच वर्षांत होतील, असे प्रतिपादन केले.

आमदार प्रशांत ठाकूर यांनी बोलताना, अमर पाटील यांनी गेल्या पाच वर्षांमध्ये नगरसेवक, सभापती, पक्षाचा पदाधिकारी व कार्यकर्ता म्हणून जी जबाबदारी मिळाली ती पूर्ण करण्यासाठी सर्व झोकून काम केले त्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले. ते पुढे म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सबका साथ सबका विकास हे सूत्र घेऊन देशभरात काम करीत असून कळंबोलीतील नगरसेवकही नागरिकांना विविध सुविधा देण्याकरिता सातत्याने पाठपुरावा करीत आहेत. सबका प्रयास लक्षात घेऊन लोकांपर्यंत भारतीय जनता पक्ष अधिकाधिक पोहचावा तसेच नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी सातत्याने कार्यरत राहूया.

महापौर डॉ. कविता चौतमोल यांनी सांगितले की, अमर पाटील यांनी विकासकामे करण्याकरिता महापालिका आणि नगरसेवक निधी तसेच गरज पडल्यास स्वतःच्या खर्चाने विकासाची कामे केली आहेत. त्यांचे हे सेवाकार्य असेच सुरू रहावे, असे सांगत त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

# महावितरणच्या नेरूळ विभागात देखभाल-दुरुस्तीची कामे वेगात



**मुंबई : बातमीदार**

पावसाळा आला की सर्व शासकीय यंत्रणांना दुप्पट गतीने कामे करावी लागतात. सुरक्षेच्या दृष्टीने आपल्या अखत्यारीतील विविध घटकांवर विशेष लक्ष द्यावे लागते. महावितरणची यंत्रणा उघड्यावर असल्यामुळे, महावितरणच्या कर्मचारी व अधिकाऱ्यांना सतर्क राहणे अत्यंत महत्त्वाचे आहे. याचाच एक भाग म्हणून पावसाळ्यापूर्वी करण्यात येणारी देखभाल व दुरुस्तीची कामे आहेत. जर पावसाळ्यापूर्वी देखभाल व दुरुस्तीची कामे केली तर आपण चांगली व अखंडित वीज ग्राहकांना देऊ शकतो. तसेच संभाव्य विद्युत धोका ही आपण टाळू शकतो. महावितरण भांडूप परिमंडलाचे, मुख्य अभियंता धनंजय औढेंकर यांनी सर्व विभागातील कार्यकारी अभियंत्यांना पावसाळ्यापूर्वी देखभाल दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे निर्देश दिले होते. त्याप्रमाणे कार्यकारी अभियंता नेरुळ, यांच्या मार्गदर्शनाखाली या कामांना सुरुवात केली असून ही काम पूर्णत्वावर आली आहेत. वाशी मंडळाचे अधीक्षक अभियंता पाठपुरावा करत असल्यामुळे कामाला अजून वेग आला आहे. नेरूळ विभागांतर्गत आतापर्यंत एकूण २५६ फिडर पिलरच्या दुरुस्तीची कामे झाली आहेत. अग्रोळी व दिवाळे गावात फीडर पिलर दुरुस्तीचे तसेच जमिनीवरील केबल भूमिगत करण्यासाठी उत्कृष्ट काम केल्याबद्दल, सहाय्यक अभियंता नेरूळ रोहित बागुल यांचे कौतुक तेथील ग्रामस्थांनी केले.

**लग्नासाठी वर पाहिजे**

वधु, वय २५ वर्षे, उंची ५.३ फुट, रंग गोरा (हिंदू–मराठा) १२ वी शिक्षण असलेल्या दत्तक मुलीकरिता सुयोग्य वर पाहिजे. शेती ३ एकर (जातीची अट नाही)

◆ संपर्क ◆

मो.: 84211 68826 / 97676 34994

# नेरळ येथे दहावीची परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्याचा लोकलच्या धडकेत मृत्यू

**कर्जत : बातमीदार**

नेरळ गावातील हाजी लियाकत इंग्लिश मिडीयम स्कूलचा दहावी इयत्तेतील १६ वर्षीय विद्यार्थी साहिल संभाजी ठोंबरे या विद्यार्थ्यांचा रेल्वे रूळ ओलांडत असताना अपघात झाला आणि त्यात त्याचा मृत्यू झाला आहे. संभाजी ठोंबरे हे नेरळपाडा भागातील ओंमकार सदनमधील रहिवासी असून त्यांचा मुलगा साहिल या वर्षी दहावीला होता.

साहिलला दहावीच्या परीक्षेत ५१ टक्के गुण मिळाले होते. दुपारी दहावीचा ऑनलाइन निकाल लागल्यावर त्याला कमी गुण मिळाल्याने साहिल हा काहीसा नाराज होता, पण आपल्या शाळेचा निकाल १०० टक्के लागल्याने तो आपली नाराजी विसरून गेला होता. दिवसभर घरीच असलेला साहिल हा सव्वाचार वाजता नेहमीप्रमाणे क्रिकेट खेळण्यासाठी तो घरातून निघाला. रेल्वेमार्ग ओलांडत असताना मुंबई येथून कर्जतकडे जाणाऱ्या उपनगरीय लोकल गाडीने त्याला धडक दिली आणि त्या धडकेत साहिलचा मृत्यू झाला. रेल्वे पोलिसांनी त्याचा मृतदेह शवविच्छेदन करण्यासाठी पाठविला आहे.




**पनवेल भाजपतर्फे जनहितार्थ माहितीसाठी**

**पनवेल महानगरपालिका हद्दीत शनिवार, दि. १८ जून २०२२ रोजी होणारे**

**कोरोना प्रतिबंधक लसीकरण**

(सर्व केंद्रांवर ऑनलाइन व ऑफलाइन लसीकरण होईल)

कोविशिल्ड · कोव्हॅक्सिन · कार्बेव्हॅक्स

सर्व केंद्रांवर (वयोगट : १२ वर्षांवरील सर्व नागरिकांसाठी)

- १. यूपीएचसी–१, गावदेवी पाडा, पनवेल
- २. रोटरी क्लब, से. १९, नवीन पनवेल
- ३. यूपीएचसी–४, सिडको समाज मंदिर, कळंबोली
- ४. यूपीएचसी–५, डी–मार्टच्या मागे, सेक्टर १५, खारघर
- ५. यूपीएचसी–६, सुषमा पाटील विद्यालय, कामोठे
- ६. टाटा ॲडव्हान्स सेंटर, खारघर
- ७. आरोग्य उपकेंद्र काळभैरव मंगल कार्यालय, प्रभाग समिती ब कार्यालयाच्या बाजूला, कळंबोली
- ८. उपजिल्हा रुग्णालय, पनवेल

**Pricautionary dose हे फक्त दुसरा डोस घेऊन नऊ महिने पूर्ण झालेल्या HCW, FLW, व ६० वर्षांवरील Comorbid व्यक्तिंचेच लसीकरण केले जाईल याची नोंद घ्यावी.**

# दहावीच्या परीक्षेत निकालाची टक्केवारी वाढली

**बारावी परिक्षा निकालानंतर दहावी परिक्षेच्या निकालाकडे विद्यार्थी आणि पालकांचे लक्ष लागून राहिले होते. गतवर्षीपेक्षा यावर्षी निकालाची टक्केवारी वाढली आहे. बऱ्याच शाळांमध्ये १०० टक्के निकाल लागला आहे. दरवर्षीप्रमाणे यंदाही दहावी परिक्षा निकालामध्ये मुलींनी बाजी मारल्याचे दिसून येत आहे. विद्यार्थी आणि त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व शिक्षकांचे सर्वत्र अभिनंदन करण्यात येत आहे.**

## गव्हाण विद्यालयाने निकालाची उज्ज्वल परंपरा यंदाही जपली

९८.८५ टक्के निकाल, तर गुरूकुल आणि सेमी माध्यमाचा निकाल १०० टक्के

**गव्हाण : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण कोपर येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत जुनियर कॉलेज इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा मार्च-एप्रिल २०२२चा निकाल ९८.८५ टक्के लागला असून उज्ज्वल निकालाची परंपरा विद्यालयाने यंदाही कायम राखल्याबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे. गुरूकुल व सेमी इंग्रजी माध्यमाचा निकाल शंभर टक्के लागला आहे.

शशिकांत विलास चौगुले हा विद्यार्थी ४५९ गुण (९१.८० टक्के) प्राप्त करून विद्यालयात प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला तर अन्सारी सानिया अलीम आणि घरत सिद्धी मंगल या दोन विद्यार्थिनींना ४५१ असे समान गुण (९०.२० टक्के) प्राप्त झाल्याने त्यांना द्वितीय क्रमांक प्राप्त झाला. प्रणिता मोहन भोसले ही ४५० गुण (९० टक्के) गुण प्राप्त करुन विद्यालयात तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाली.

एच.एस.सी.परीक्षेपाठोपाठ एस.एस.सी.परीक्षेतही विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्तम यश प्राप्त केल्याबद्दल सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन विद्यालयाचे आधारस्तंभ रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी व समन्वय समिती सदस्य अरुणशेठ भगत, विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे सदस्य अनंताशेठ ठाकूर व विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे उपसरपंच विजयशेठ घरत, विद्यालयाच्या प्राचार्य साधनाताई डोईफोडे, रयत शिक्षण संस्थेचे लाईफ मेंबर व समन्वय समिती सदस्य प्रमोद कोळी व रवींद्र भोईर, रयत शिक्षण संस्थेच्या लाईफ वर्कर ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षक दीपक भर्णुके आदींनी केले.

## पनवेल तालुक्याचा निकाल ९७.६१ टक्के; विद्यार्थ्यांचे अभिनंदन

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्याचा दहावीचा निकाल ऑनलाइन जाहीर होऊन ९७.६१ टक्के लागल्याने पालकांसह विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

विद्यार्थ्यांना अनेक दिवसांपासून ज्या दहावीच्या निकालाची आतुरता लागली होती तो निकाल शुक्रवारी (दि. १७) जाहीर झाला आहे. महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने पत्रकार परिषद घेत या निकालाची घोषणा केली. यामध्ये पनवेल तालुक्यातील ११,८७१ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यामधून ६,०६५ मुले उत्तीर्ण झाली तर ५,५२३ मुली उत्तीर्ण झाल्या आहेत.

तालुक्यातील जवळपास ८८ विद्यालयाचा निकाल १०० टक्के लागला आहे. त्यामध्ये प्रामुख्याने सीकेटी विद्यालय १०० टक्के, लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल १०० टक्के, न्यू इंग्लिश स्कूल १०० टक्के, नेरे हायस्कूल १०० टक्के, नॅशनल उर्दू हायस्कूल १०० टक्के, के.पाटील माध्यमिक विद्यालय १०० टक्के, महाराष्ट्र स्कूल १०० टक्के, मोरू नारायण म्हात्रे स्कूल १००टक्के, बार्न्स स्कूल १०० टक्क्ज आदी शाळांनी आपली १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखली आहे.



(संग्रहित छायाचित्र)

## उरण तालुक्याचा निकाल ९७.३५ टक्के; पालकवर्ग सुखावला

**उरण : प्रतिनिधी**

दहावीचा निकाल जाहीर झाला असून उरण तालुक्यातुन २४५६ विद्यार्थ्यांपैकी २३९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. उरण तालुक्याचा निकाल ९७.३५ टक्के लागला आहे. उरण तालुक्यात २८ शाळा आहेत. या २८ शाळांमधुन दहावीच्या परीक्षेत २४५६ विद्यार्थी परिक्षेत बसले होते. त्यापैकी २३९१ विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

तालुक्याचा निकाल ९७.३५ टक्के लागला आहे. २८ शाळांपैकी तालुक्यातील सिटीझन हायस्कूल उरण, द्रोणागिरी हायस्कूल करंजा, पांडूरंग पाटील विद्यालय उरण, के.बी. पाटील विद्यालय पिरकोन, छत्रपती शिवाजी महाराज विद्यालय उरण, द्रोणागिरी हायस्कूल करंजा, जेएनपी विद्यालय, रोटरी इंग्रजी माध्यम, पी.एन पाटील मोठीजूई, सेंट मेरी स्कूल, सावरकर माध्यमिक विद्यालय नवीनशेवा, पुंडलिक पाटील हायस्कूल, पदाजी मुंबईकर विद्यालय, भागूबाई ठाकूर विद्यालय आणि पी.पी. खारपाटील इंग्रजी माध्यम या १७ शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे.

परीक्षेला बसलेल्या एकूण विद्यार्थ्यांपैकी ८७४ विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये, ९४६ विद्यार्थी पहिल्या ग्रेडमध्ये व ४८० विद्यार्थी दुसऱ्या ग्रेडमध्ये तर ९१ विद्यार्थी पास ग्रेड मध्ये पास झाले आहेत, अशी माहिती उरण गटशिक्षणाधिकारी प्रियांका पाटील यांनी दिली आहे.

## पनवेल शहरात सात ठिकाणी हायमास्ट

■ नगरसेवक अनिल भगत यांच्या निधीतून सुविधा

**पनवेल: रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेचे नगरसेवक नागरीकांना विविध सुविधा देण्यात करीता सातत्याने पाठपुरावा करत आहेत. त्याअंतर्गत नगरसेवक अनिल भगत यांच्या नगरसेवक निधीमधून शहरातील सात ठिकाणी हायमास्ट उभारण्यात आले आहेत. या हायमास्टचे गुरुवारी मान्यवरांच्या हस्ते लोकार्पण झाले.

पनवेल शहरातील कोळीवाडा येथील विसर्जन घाट, कोळीवाडा, स्मशानभुमी, भारतगॅस, रोहिदास वाडा, महावितरण कंपनी समोर तसेच नवनाथ मंदिर या ठिकाणी नगरसेवक अनिल भगत यांच्या नगरसेवक निधीमधून हायमास्ट उभारण्यात आले असून त्याचे मान्यवरांच्या हस्ते गुरुवारी लोकार्पण झाले. या वेळी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, रुचिता लोंढे, प्रभाग क्रमांक १९ अध्यक्ष पवण सोनी, मंगेश पिलविळकर, विलास गायकवाड, हरिचंद्र भगत, दत्ता पाटील, संदीप पाटील, प्रसाद कंधारे, तानाजी झुगे, निर्मला वैती, सुनील खलदे, गणेश भगत, गजानन भगत, हरिचंद्र भोईर, विनायक मुंबईकर यांच्यासह पदाधिकारी आणि मान्यवर उपस्थित होते.



## पनवेल महापालिका क्षेत्रात रविवारी पोलिओ लसीकरण

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महापालिका क्षेत्रात येत्या रविवारी (दि. १९) पल्स पोलिओ मोहीम राबविण्यात येणार आहे. यामध्ये ० ते ५ वयोगटातील प्रत्येक बालकाला पोलिओ लसीकरण करण्यात येणार आहे. यासाठी मनपा आरोग्य विभागाने नियोजन केले आहे.

सहा नागरी आरोग्य केंद्रांच्या क्षेत्रात ३३१ स्थायी, २४ ट्रान्झिट व ४४ फिरते मोबाईल असे एकूण ३९९ पोलिओ लसीकरण बुथ कार्यरत असणार आहेत. वंचित बालकांचे पुढील पाच दिवस लसीकरण करण्यात येईल. वैद्यकीय आरोग्य विभागाचे मुख्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी आणि आरसीएच अधिकारी डॉ. रेहाना मुजावर यांनी याचे नियोजन केले आहे.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर, भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत, एकनाथशेठ देशेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चिंध्रण ग्रामपंचायत हद्दीतील मरीआई मंदिर ते कोणार्क कॉलनी (ठेकणी) रस्त्याचे काँक्रीटीकरण काम पूर्ण झाले आहे. यामुळे चिंध्रणच्या सरपंच कमला एकनाथ देशेकर तसेच उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य यांचे सर्व ग्रामस्थांनी मनःपूर्वक आभार मानले.**

## अपहृत बालकाची १२ तासांत सुटका

पनवेल तालुका पोलिसांची कामगिरी; बालकाला नातेवाईकांकडे केले सुपूर्द

**पनवेल : संजय कदम**

दोन वर्षाच्या अल्पवयीन अपहृत बालकाची पनवेल तालुका पोलिसांच्या पथकाने गुप्त बातमीदार व तांत्रिक तपासाच्या आधारे अवघ्या १२ तासाच्या आत सुटका केल्याने तालुका पोलिसांचे कौतुक होत आहे.

अधिक वृत्त असे, तळोजा पोलीस ठाण्याचे व.पो.नि. जितेंद्र सोनावणे यांनी तालुका पोलीस ठाण्याचे व.पो.नि. रविंद्र दौडकर यांना या घटनेची माहिती दिली. यावेळी पोलीस ठाणे नेमणुकीतील पो.शि. संदेश उत्तेकर यांना ही खबर मिळाली त्यानुसार एका महिलेने अल्पवयीन बालकास अपहरण करुन त्यास भिंगारवाडी, ता. पनवेल येथे लपवून ठेवले आहे व तिच्या सोबतच्या मोबाईलनंबर संदर्भात माहिती मिळाली. ही माहीती मिळताच तात्काळ वपोनि रविंद्र दौंडकर यांनी पोलीस उपआयुक्त, परिमंडळ-१, वाशी नवी मुंबई व सहा.पोलीस आयुक्त, पनवेल विभाग यांना माहिती देवून त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हेप्रकटीकरण पथकाचे सपोनि संजय गळवे व पथकास प्राप्त बातमीची शहानिशा करणेकामी रवाना केले. या माहितीवरुन या पथकाने तांत्रिक तपास करुन प्राप्त माहितीच्या आधारे खानावळे वाडी, बोधलेवाडी आदिवासी पाडा, खानावळे येथुन महिलेस ताब्यात घेतले व तिच्याकडे अपहृत बालकाबाबत चौकशी केली असता तिने अपहृत मुल स्वतःच्या घरात लपवुन ठेवल्याचे सांगितले. तात्काळ मपोशि घरत हिच्या मदतीने अल्पवयीन मुलगा वय अंदाजे २ वर्षे यास ताब्यात घेवून त्याची यशस्वीरित्या सुखरूप सुटका केली. तसेच महिला आरोपी नामे शेवंता एकनाथ कातकरी (वय ३०, रा. कातकरवाडी, वाजपूर) हिला ताब्यात घेण्यात आले. तिची चौकशी करता तिने सदरचे बालक हे रेल्वे बुकिंग ऑफीसजवळ, पनवेल रेल्वे स्टेशन, पनवेल येथुन पळवून आणल्याचे सांगितले. याबाबत पनवेल रेल्वे पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल झाला आहे.



तात्काळ सदरची माहिती पनवेल रेल्वे पोलीस स्टेशनचे पोलीस निरिक्षक पाडवी यांना देण्यात आली. त्यांनी अल्पवयीन मुलाचे आई-वडीलांना समक्ष पनवेल तालुका पोलीस ठाणे येथे आणले व त्यांच्याकरवी खात्री करून हे बालक त्यांचाच मुलगा असल्याचे सांगितले व त्यांनी नवी मुंबई पोलीस व रेल्वे पोलिसांचे आभार मानले.

ही कामगिरी पोलीस आयुक्त बिपीन कुमार सिंह, पोलीस सह आयुक्त डॉ. जय जाधव, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १ विवेक पानसरे, सहाय्यक पोलीस आयुक्त पनवेल विभाग भागवत सोनवणे, यांचे मार्गदर्शनाखाली रविंद्र दौडकर वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पनवेल तालुका पो. ठाणे, जितेंद्र सोनावणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक तळोजा पो. ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे सहा पोलीस निरिक्षक संजय गळवे, पो.ह. महेश् धुमाळ, पो.ना. पंकज चंदिले, पो.ना. प्रकाश मेहेर, पोहवा विकास साळव पो.ना. जयदिप पवार, पो.ना. वैभव शिंदे, पो. शि. संदेश उत्तेकर भिंगारवाडीचे पोलीस पाटील संतोष गायकर पथकाने केलेली आहे. गुन्ह्याचा पुढील तपास पनवेल रेल्वे पोलीस स्टेशनचे पो.नि. प्रविण पाडवी करीत आहेत.

## बांधकाम व्यावसायिकाने ठगविल्यामुळे दाम्पत्याने जीवन संपविण्याचा केला प्रयत्न

**पनवेल : वार्ताहर**

बांधकाम व्यावसायिकाने ठगवल्यामुळे पनवेल शहरातील डेहपे परिवारातील पती-पत्नीने आपले जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. एक व्हिडीओ काढून त्यांनी फिनाइल हे विषारी औषध पित जीवन संपविण्याचा प्रयत्न केला.

शहानवाज हुसेन मिया पटेल व अशपाक हुसेन मिया पटेल या बांधकाम व्यावसायिकाने फसविले तसेच न्याय मिळत नसल्याने हताश झालेल्या सोहेल मुस्ताक डेहपे व शाइस्ता सोहेल डेहपे या जोडप्याने हे पाऊल उचलले.

पैसे परत मिळावेत म्हणून डेहपे दाम्पत्याने बांधकाम व्यावसायिक शाहनवाज मिया पटेल यांच्याकडे प्रयत्न केले, मात्र त्यांनी पैसे देणार नसल्याचे सांगताच दाम्पत्याने विषारी औषध पिऊन जीवन संपविण्याचा प्रयत्न केला. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

## नवीन पोसरी परिसरातील पथदिवे नागरिकांच्या उद्रेकानंतर पूर्ववत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

नवीन पोसरी परिसरातील पथदिवे पूर्ववत करण्यासाठी गुरुवारी दि.१७ रोजी नविन पोसरी व बाजारपेठेतील दुकानदार, ग्रामस्थांनी एकत्र येऊन सदर समस्येवर आवाज उठवत मोहोपाडा वीजमंडळ कार्यालयावर मोर्चा काढला. नागरिकांनी या वेळी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. त्यानंतर अधिकाऱ्यांकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आणि पथदिवे पूर्ववत झाले.

पाताळगंगा परिसरातील मुख्य बाजारपेठ असणाऱ्या मोहोपाडा व नवीन पोसरी येथील मार्केटमधील स्ट्रीट लाईट गेल्या सहा ते सात महिन्यापासून बंद असल्याने परिसरातील नागरिकांत नाराजीचा सूर होता. त्यानंतर नागरिकांनी एकत्र येत थेट वीज कार्यालय गाठले. नवीन पोसरी गाव बाजारपेठेतील स्ट्रीट लाईट चालू करण्यात यावी अशा मागणीचे निवेदन व्यापारी असोसिएशन व नवीन पोसरी ग्रामस्थांतर्फे एमएसईबी अधिकारी किशोरकुमार पाटील यांना देण्यात आले. या वेळी लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, स्ट्रीट लाईट चालू करण्यासंदर्भात व्यापारी असोसिएशनतर्फे निवेदन देण्यात आले असून स्ट्रीट लाईटसाठी नवीन मिटर लावून स्ट्रीट लाईट चालू करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतीने स्ट्रीट लाईटचे थकबाकी बिल भरावे, असे वीज वितरणचे उपअभियंता किशोर पाटील यांनी सांगितले.

## खारघरमधून जागृत भारत अभियानाची सुरुवात

**खारघर : रामप्रहर वृत्त**


जागृत भारत अभियानाचे प्रवर्तक त्र्यंबकेश्वर नाशिक स्थित स्वामी श्रीकंठानंद नेहमी भारतातील प्रत्येक नागरीकाला भारतीय चेतने विषयी जागृत करीत असतात. या जागरण कार्यात खारघर नवी मुंबई येथील कार्यकर्त्यांनी रस घेऊन जागृत नवी मुंबई जागृत भारत या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक १६ जून रोजी करण्यात आले. हा कार्यक्रम खारघर येथील भवानी माता मंदिर येथे झाला.

खारघर व पनवेलवासीयांनी या भारत जागृत अभियानाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. स्वामी श्रीकंठानंद म्हणाले, भारतात जन्म घेणे फारच भाग्याचे लक्षण आहे. भारतीय परंपरांचा आधार हा वैज्ञानिक आहे. भारतीय अध्यात्म ही पॉवर बँक आहे, ज्यामुळे सर्वांचे जीवन उर्जासंपन्न व उत्साहपूर्ण राहण्यास मदत होते.



स्वामीजींच्या उद्बोधनानंतर प्रश्नोत्तरीचे सत्र घेण्यात आले व त्या सत्रात श्रोत्यांचे समाधान झाले. उपस्थित श्रोत्यांनी या माहितीस्पद कार्यक्रमासाठी 'जागृत नवी मुंबई जागृत भारत'च्या कार्यकर्त्यां०-०चे आभार मानले.

कार्यक्रम पार पाडण्यासाठी शिवम सिंग, ललीत चौधरी, विभोर गोयल यांनी परिश्रम घेतले. ज्ञानेश्वर खरपुरीया यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. बिना गोगरी यांनी उपस्थितांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.



## संपादकीय

# आगीशी खेळ

केवळ गैरसमजापायी एखाद्या चांगल्या योजनेचा बट्याबोळ कसा होतो याची उदाहरणे आपल्या देशात कमी अथवा नवीन नाहीत. एखाद्या योजनेचा हेतू चांगला असला तरी अंमलबजावणी मात्र वादग्रस्त ठरते. शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी केंद्र सरकारने केलेले कायदे काही जणांच्या पचनी पडले नाहीत. त्यामुळे उभ्या राहिलेल्या लोकक्षोभापायी शेतकऱ्यांचे कल्याण करणारी एक चांगली योजना केंद्र सरकारला गुंडाळावी लागली. अल्पकालीन सैन्यभरतीसाठी केंद्र सरकारने नुकत्याच जाहीर केलेल्या अग्निपथ योजनेचे तसेच काही होणार का अशी भीती वाटू लागली आहे.

**उत्तर प्रदेश, बिहारसह काही राज्यांमध्ये तरुणांनी रस्त्यावर उतरून जाळपोळ करत नव्या अग्निपथ योजनेचा निषेध सुरू केला आहे. अग्निपथ योजनेंतर्गत चार वर्षांसाठी अग्निवीरांची भरती करण्यात येणार असल्याची घोषणा केंद्र सरकारने मंगळवारी केली होती. त्यानंतर सर्वप्रथम बिहारमध्ये निषेधाचा सूर उमटला. तेथील बहुतांश जिल्ह्यांमध्ये तरुणांनी रस्त्यांवर जाळपोळ केली. तसेच रेल्वेमार्ग देखील उद्ध्वस्त केले. आरा रेल्वेस्थानकावर तर एका रेल्वे इंजिनाला आग लावण्यात आली. उत्तर प्रदेशातदेखील दगडफेक, घोषणाबाजीचे प्रकार घडले. वास्तविक पाहता अग्निपथ ही अतिशय समयोचित आणि भविष्यवेधी योजना आहे. या योजनेमुळे तरुणांना उत्तम प्रशिक्षणासोबतच चांगली मासिक मिळकत उपलब्ध होईल. त्याचबरोबर सैनिकांना मिळणाऱ्या काही सुविधा देखील उपलब्ध होतील. अग्निपथ ही योजना कोणालाही सक्तीची नाही. दरवर्षी ५० हजार अग्निवीरांची भरती करण्यात येणार असून ती नियुक्ती चार वर्षांसाठी असेल. त्यानंतर एखाद्या अग्निवीरास लष्करी सेवेमध्ये सामील होण्याची इच्छा असेल तर त्याला प्राधान्य दिले जाईल. इस्राइलसारख्या अनेक छोट्यामोठ्या देशांमध्ये तरुणांना किमान दोन वर्षांची लष्करी सेवा सक्तीची आहे. अर्थात या प्रशिक्षित अग्निवीरांना सरसकट सरहद्दीवर युद्धासाठी पाठवले जाईल असा काही त्याचा अर्थ होत नाही. लष्करामधील अनेक सेवा पिछाडीवर राहूनच पार पाडल्या जातात. तरुणांमध्ये राष्ट्रभक्तीचा जोश असतो, त्याला उत्तम वळण देऊ पाहणारी ही योजना आहे. या अग्निवीरांना चार वर्षांच्या सेवेनंतर सुमारे बारा लाखांचा सेवानिधी, बँक कर्ज योजनांचा लाभ आणि बारावीच्या समकक्ष प्रमाणपत्रही मिळणार आहे. अग्निवीरांच्या भरतीसाठी वयोमर्यादा २१पर्यंत होती. जनक्षोभ पाहून ही मर्यादा २३ करण्याचा निर्णय केंद्राने घेतला आहे. तथापि इतकी चांगली योजना असूनही तरुणांची प्रतिक्रिया सकारात्मक उमटली नाही हे आपले दुर्दैव म्हणावे लागेल. केवळ अज्ञानातून झालेले गैरसमज आणि संधीसाधू विरोधकांनी त्या गैरसमजांना घातलेले खतपाणी यामुळे जाळपोळीचे प्रकार बघावे लागले. अग्निपथ योजनेवर काँग्रेससह काही पक्षांनी निष्कारण टीका केली. तरुणांना अग्निपथावर चालायला लावू नका. तरुणांचा स्वप्नभंग करू नका. चार वर्षांच्या सेवेनंतर रोजगाराचे काय होणार असले आक्षेप विरोधकांनी घेतले आहेत. काँग्रेसचे खासदार राहुल गांधी यांनी तर वरिष्ठ लष्करी अधिकाऱ्यांशी बोलून मगच अशी योजना आणायला हवी होती अशी टीका केली. मुळात ही योजना लष्करी अधिकाऱ्यांनीच संपूर्ण अभ्यासाअंती तयार केली आहे ही मूलभूत माहिती देखील त्यांच्याकडे नसावी हे दुर्दैव. एखाद्या योजनेवर उलटसुलट चर्चा होणे हे सुदृढ लोकशाहीचेच लक्षण आहे. किंबहुना तशी चर्चा होणे आवश्यकच आहे. परंतु अज्ञानापोटी जाळपोळ आणि हिंसाचाराचा मार्ग अवलंबणे हा काही चर्चेचा भाग होऊ शकत नाही. शांतपणे विचार केला तर तरुणांना या योजनेतील लाभदायक कलमे दिसू लागतील.**

# शासकीय दाखला घेण्यासाठी ई-केंद्र सुविधा

**नागरिकांच्या सोयीसाठी शासकीय स्तरावर विविध सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता करून या सेवांचा लाभ नागरिकांना घेता येईल.**

दहावी–बारावीचे नुकतेच निकाल लागले आहेत. निकालानंतर पुढील शैक्षणिक कामांसाठी लागणाऱ्या दाखल्यांकरिता विद्यार्थी व पालकांची लगबग सुरु झाली आहे. तहसील कार्यालये, जिल्हाधिकारी कार्यालये, सेतू केंद्र, आपले सरकार पोर्टलकेंद्र अशा ठिकाणच्या वाऱ्या पालकांना सतत कराव्या लागतात. एप्रिल ते जुलैअखरे डोमिसाईल, जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, नॉन क्रिमिलेअर व रहिवासी, आदी स्वरूपाचे विविध दाखल्यांसाठी पालक आणि विद्यार्थ्यांच्या फेऱ्या चालू राहतात. शासनाच्या विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी आवश्यक असलेल्या दाखल्यांसाठीही शासकीय कार्यालयांच्या फेऱ्या माराव्या लागतात. अशावेळी दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांमध्ये त्रूटी आढळल्यातर पुन्हा फेऱ्या वाढतात. यामुळे वेळेसोबत विनाकारण आर्थिक नुकसानही होते. पालक आणि विद्यार्थ्यांचे आर्थिक नुकसान होऊ नये, त्यांची दलांलामार्फत फसवणूक होऊ नये यासाठी शासनाने ई–सेवा केंद्र, आपले सरकार, सेतु यासारख्या सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. या सेवांमुळे शासकीय दाखले मिळणे सोपे झाले आहे.

शैक्षणिक कामांसाठी, विविध योजनांचा लाभ घेण्यासाठी, नोकरी संदर्भात आवश्यक असलेले दाखले काढण्यासाठी शासनाच्या नियमावलीनुसार आवश्यक कागदपत्रे आपण आधीच तयार ठेवली, तर दाखले काढताना लागणारा वेळ वाचेल, आर्थिक नुकसानही होणार नाही. विनाकारण छोट्या छोट्या कागदपत्रांसाठी माराव्या लागणाऱ्या फेऱ्याही वाचतील. शैक्षणिक तसेच नोकरी संदर्भात लागणारे विविध दाखल्यांसाठी आवश्यक कागदपत्रांची यादी (चेकलीस्ट) पुढील प्रमाणे आहे.

**शासकीय दाखल्यांसाठी लागणारे कागदपत्रे**

**उत्पन्न दाखला (१ वर्षे) :** तलाठी रहिवाशी दाखला, तलाठी उत्पन्न दाखला, शेती असलेस ७/१२ उतारा व ८ अ, नोकरी असलेस पगार दाखला, पेन्शन असलेस पासबुक झेरॉक्स, रेशन कार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**उत्पन्न दाखला नॉन क्रिमीलेयर** : तलाठी रहिवाशी दाखला, तलाठी ३ वर्षाचा उत्पन्नाचा दाखला, शेती असलेस ७/१२ उतारा व ८ अ, नोकरी असलेस पगार दाखला, पेन्शन असलेस पासबुक झेरॉक्स, रेशन कार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**उत्पन्न दाखला सरकारी योजना/ वैद्यकीय कामी :** तलाठी रहिवाशी दाखला, तलाठी उत्पन्नाचा दाखला, मंडळ अधिकारी (सर्कल) चौकशी अहवाल, शेती असलेस ७/१२ उतारा व ८ अ, रेशन कार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**दुबार/हरवलेले रेशनकार्ड :** धान्य दुकानदार यांचा रेशनकार्ड खराब/ हरवलेचा दाखला, तहसीलदार यांच्या सहिने उत्पन्न दाखला, हरवलेले असल्यास पोलीस स्टेशनचा दाखला, खराबसाठी मुळ रेशनकार्ड/ हरवलेले असल्यास झेरॉक्स, सर्वांची आधारकार्ड झेरॉक्स.

**–नॉन क्रिमीलेयर :** तहसीलदार उत्पन्न दाखला (३ वर्षाच्या उत्पन्नासहीत), जातीच्या 'ड' दाखल्याची झेरॉक्स रेशन कार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**डोमेसाईल/डोंगरीदाखला/ स्थानिक रहिवाशी दाखला(SEC) :** तलाठी रहिवाशी दाखला, शाळा सोडलेचा दाखला/ जन्मनोंद, दहावी किंवा बारावी प्रमाणपत्र/मार्कलिस्ट, रेशन कार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**गॅझेट (राजपत्र) :** नावात बदल वेगळी नावे असणारे दोन पुरावे, उदा. मतदान ओळखपत्र, आधारकार्ड, ७/१२ किंवा ८ अ उतारे, फिडेव्हीट, इतर, जन्मतारखेत बदल : जुनी जन्म तारीख व नविन जन्म तारीख यांचे पुरावे व मतदान ओळखपत्र, आधारकार्ड झेरॉक्स इत्यादी

**रेशनकार्डवर नाव वाढवणे :** मुलांची नावे वाढवण्यासाठी–जन्म दाखला, बोनाफाईड, आधारकार्ड झेरॉक्स, स्वत:चे रेशनकार्ड, पत्नीचे नावे वाढवण्यासाठी–विवाह नोंद दाखला व जुन्या रेशनकार्ड मधील नाव कमी केलेचा दाखला. (पत्नी तालुक्याच्या बाहेरची असेल तर नाव कमी केलेचा दाखला किंवा पत्नी तालुक्यातील असेल तर माहेरचे रेशनकार्ड) आधारकार्ड झेरॉक्स व स्वत:चे रेशनकार्ड.

**जातीचा दाखला :** तलाठी रहिवाशी व जातीचा दाखला, अर्जदार शाळा सोडलेचा दाखला, जन्म नोंद दाखला किंवा बोनाफाईड, वडील, आजोबा, पणजोबा, चुलत आजोबा, चुलत पणजोबा, यांचा शाळा सोडलेचा दाखला, जन्म नोंद दाखला किंवा बोनाफाईड (मयत असल्यास मृत्यूनोंद) सदर दाखल्यावर जातीचा उल्लेख असणे आवश्यक आहे, ओबीसी साठी १९६७ पूर्वीचा जात पुरावा, एसबीसीसाठी १९६१ पूर्वीचा जात पुरावा, व्हीजेएनटीसाठी १९६१ पूर्वीचा जात पुरावा, एस.सी. साठी १९५० पूर्वीचा जात पुरावा, कुणबीसाठी १९२० ते १९३० मधील पुरावा, पोलीस पाटील व सरपंच यांचे सहीने वंशावळ, सरळ वंशावळ नसल्यास महसूली पुरावे, रेशनकार्ड झेरॉक्स, आधारकार्ड झेरॉक्स, फोटो.

**आधारकार्ड :** नवीन –१८ वर्षावरील : मतदान ओळखपत्र व रेशनकार्ड ५ ते १८ वर्षामधील : जन्म नोंद दाखला/ बोनाफाईड, ग्रामपंचायत रहिवाशी दाखला व रेशनकार्ड.५ वर्षाखालील : जन्म नोंद दाखला किंवा बोनाफाईड, आई/वडिलांचे आधारकार्ड

**दुरुस्ती :** विवाहानंतर असेलतर : जुने आधारकार्ड फोटो लावून ग्रामपंचायत रहिवाशी दाखला (फोटोवर गोल शिक्का मारुन व रेशनकार्ड) नाव, पत्ता किंवा जन्मतारीख : फोटोलावून ग्रामपंचायत रहिवाशी दाखला, पॅनकार्ड, बोनाफाईड/ जन्म दाखला व रेशनकार्ड.

**पॅनकार्ड :** २ फोटो, आधारकार्ड झेरॉक्स, जन्मतारखेचा पुरावा, (जन्मनोंद/दहावी बोर्ड सर्टिफिकेट/ फिडेव्हीट) (टिप : आधारकार्डवर संपूर्ण जन्मतारीख असलेस जन्मतारखेचा पुरावा लागत नाही)

**नवीन/विभक्त रेशनकार्ड :** स्वत:चे नावे घरठाण उतारा, स्वत:चे नावे घरपटटी पावती, स्वत:चे नावे लाईट बील, तहसिलदार यांच्या सहीचा उत्पन्न दाखला, धान्य दुकानदार यांचा विभक्त असलेला दाखला, पोलीस पाटील यांचा विभक्त असलेला दाखला, जुन्या रेशनकार्डची झेरॉक्स, १०० रु. स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र (आई–वडीलांच्या रेशनकार्डमध्ये किमान एक मुलगा तरी राहिला पाहिजे, जर मुलगा विभक्त किंवा नविन रेशनकार्ड दिले जाणार नाही.)

**रेशनकार्डवरील नाव कमी करणे :** मयत नाव कमी करणेसाठी मृत्यु नोंद दाखला व मूळ रेशनकार्ड, विवाह झालेले नाव कमी करणेसाठी विवाह नोंद दाखला व मूळ रेशनकार्ड, नोकरी किंवा इतर कारणास्तव नाव कमी करणेसाठी तेथील तलाठी रहिवाशी दाखला किंवा नोकरीचे पत्र व मूळ रेशनकार्ड.

शासनाने नागरिकांना त्रास होऊ नये यासाठी विविध सुविधा उपलब्ध करुन दिल्या आहेत. ई–सेवाकेंद्र, आपले सरकार, सेतु या सारख्या सुविधा नागरिकांच्या उपयोगासाठी आहेत. या सुविधा केंद्रांवर काही अडचणी आल्या, तर त्यासाठी तक्रार केंद्र देखील आहेत. नागरिकांनी या सेवांचा लाभ घ्यावा. विनाकारण दलालांकडे पैसे घालवू नये अशा सूचना शासन वारंवार देत असते. वर नमूद दाखल्यांसाठी लागणारी कागदपत्रे (चेकलीस्ट) तयार ठेवली तर, भविष्यात दाखले मिळवताना वेळेची व पैशाची बचत होईल, आवश्यक असणारी कागदपत्रे अगोदरच तयार करुन ठेवणे अधिक हिताचे आहे.

–विभागीय माहिती कार्यालय, कोकण भवन, नवी मुंबई

## बदलते तंत्रज्ञान

### स्मार्टफोनमधून 'हे' पाच ॲप डिलीट करा

सायबरसुरक्षा संशोधकांनी गेल्या महिन्यात गुगल प्ले स्टोरवर काही अत्यंत धोकादायक ॲडवेअर आणि डेटा–चोरी करणाऱ्या मालवेअर ॲप्सचा पर्दाफाश केला. वापरकर्त्यांना त्यांच्या फोनवरून ते अनइन्स्टॉल करण्यास सांगितले आहे.



गुगल प्ले स्टोअरवरील हे ॲडवेअर मालवेअर ॲन्ड्रॉइड स्मार्टफोनवर नको असलेल्या जाहिराती आणू शकतात, जे सामान्यत: घुसखोरी करू शकतात, बॅटरी संपुष्टात आणू शकतात, फोन गरम करू शकतात, वापरकर्त्याचा अनुभव खराब करू शकतात आणि आर्थिक व्यवहारही करू शकतात. सर्वांत वाईट म्हणजे ते वापरकर्त्यांना संलग्न जाहिरातींवर टॅप करण्यास भाग पाडून रिमोट ऑपरेटरसाठी पैसे कमवते. डेटा चोरणारे मालवेअरदेखील खूप धोकादायक आहे, कारण ते सोशल मीडिया आणि ऑनलाइन बँकिंग खात्यांसह वारंवार लॉग इन करीत असलेल्या वेबसाइटसाठी लॉगिन क्रेडेन्शियल्स चोरू शकतात.

**पिप पिक कॅमेरा फोटो एडिटर**

हे ॲप १ दशलक्षाहून अधिक डाउनलोड करण्यात यशस्वी झाले आहे. हे मालवेअर इमेज–एडिटिंग सॉफ्टवेअरमध्ये लपलेले असून ते फेसबुक अकाउंट लॉगिन तपशील चोरू शकते.

**वाईल्ड ॲण्ड एक्झोटिक ॲनिमल वॉलपेपर**

हा एक ॲडवेअर मालवेअर आहे जो त्याचे चिन्ह आणि नाव 'सिम टूल किट' मध्ये बदलतो आणि बॅटरी–बचत अपवाद सूचीमध्ये स्वतःला जोडतो.

**झोडी हॉर्सोस्कोप–फोर्च्यून फाइंडर**

हा आणखी एक मालवेअर आहे जो फेसबुक खाते क्रेडेंशियल चोरतो. त्याचे पाच लाखांपेक्षा डाउनलोड आहेत.

**पिप कॅमेरा २०२२**

फेसबुक अकाउंट हायजॅक करणारा मालवेअर ज्याचे ५० हजार डाउनलोड झाले आहेत. हे कॅमेरा इफेक्ट ॲप आहे.

**मॅग्निफायर फ्लॅशलाइट**

हे एक ॲडवेअर ॲप आहे जे व्हिडीओ आणि स्थिर बॅनर जाहिराती प्रदान करते. १० हजार डाउनलोड्स प्राप्त झाल्यानंतर ब्लीपिंग कॉम्प्युटर अहवाल वापरकर्त्यांना या ॲप्स आणि इतर ॲप्लिकेशन्सपासून सावध राहण्यास सांगतो, ज्यामुळे तुमचा डेटा आणि गोपनीयतेला धोका निर्माण होतो.

# 'फ्लाइंग सिख' अर्थात मिल्खा सिंग

१८ जूनला मिल्खा सिंग या धावपटूच्या झुंजीची, जिद्दीची, जिगरीची गाथा संपली. एक पर्व संपले. एका संघर्षमय यशस्वी जीवनाचा प्रवास संपला.



ॲथलेटिक्स क्षेत्रात जेव्हा भारताचे नावही कुणाला ठावूक नव्हतं त्या काळात तो धावला. उराशी संपूर्ण कुटुंबाच्या झालेल्या कत्तलीचे दु:ख घेऊन धावला. डोक्यातील जी आग त्याने सतत धगधगत ठेवली त्याच आगीचे रूपांतर धावण्याच्या ट्रॅकवर एका झंझावातात झाले. त्याच्या पहिल्या वहिल्या कॉमनवेल्थ सुवर्ण पदकाने भारताला जगाच्या ॲथलेटिक्सच्या नकाशावर आणले. १९६०च्या दशकात क्रीडा क्षेत्राला 'भारत' या देशाच्या ॲथलेटिक्स ट्रॅकवरील आगमनाची चाहूल लागली.

मिल्खा सिंगला पाहायला जगातले दर्दी प्रेक्षक यायला लागले. रोम ऑलिम्पिकमध्ये अवघ्या एक दशांश सेंकदाने त्याचे ऑलिम्पिक पदक हुकले, परंतु त्या वेळी मिल्खासिंग यांनी बरेच साध्य केले. भारतीयांसाठी अथलेटिक्स क्षेत्र नवे दालन खुले झाले. युवक धावण्याच्या शर्यतीकडे आत्कृष्ट झाले. भारतासाठी तो क्रांतीचा क्षण ठरला. क्रीडा क्षेत्रात जग ६०चे दशक भारत म्हणजे मिल्खा सिंग व मिल्खा सिंग म्हणजे भारत असे समजू लागले. ऑलिम्पिकच्या व्यासपीठावर अंतिम फेरीसाठी पात्र ठरणारे जगातील सर्वोत्तम धावपटू असतात. त्यामध्ये मिल्खा सिंग होते. नावावर ऑलिम्पिक पदक नव्हते, पण त्यापेक्षाही मोठी प्रतिमा या धावपटूने निर्माण केली. भारतीय ॲथलेटिक्स क्षेत्रासाठी ते प्रेरणास्थान ठरले. त्यांची कीर्ती आणि प्रभाव पाहून त्या काळच्या युवकांना ॲथलेटिक्सच्या मैदानावर जावेसे वाटायला लागले. भारतीय ॲथलेटिक्स क्षेत्रासाठी ते आदर्श पुरुष ठरले.

फाळणीत ज्या पाकिस्तानात त्याचे कुटुंबीय मारले गेले त्याच पाकिस्तानचे चॅम्पियन धावपटू अब्दुल खालिकविरुद्ध यांच्याबरोबर शर्यत लावण्यासाठी ते राजी नव्हते. नंतर मिल्खा सिंग पाकिस्तानात जाऊन धावले. वाघा सीमेवर त्यांच्यावर पाकिस्तानी चाहत्यांनी फुलांचा वर्षाव केला. त्या पाकळ्यांनी त्यांच्यावर झालेल्या जखमांचे घाव भरून निघाले नाहीत, मात्र मिल्खा सिंग यांची ती धाव दोन देशांमधील कटुता कमी करणारी ठरली.

शर्यतीच्या दिवशी लाहोर स्टेडियमवर सुमारे ६० हजार प्रेक्षक उपस्थित होते. त्यामध्ये तब्बल २० हजार महिला प्रेक्षक होत्या हे विशेष. शर्यत सुरू होण्याआधी पाकिस्तानच्या खालिकसाठी मौलवींनी येऊन तेथे यशासाठी दुवा मागितली. मिल्खा सिंग यांच्यासाठी हे आशीर्वाद देण्यासाठी कुणीच धर्मगुरु नव्हता. ते मौलवी परतत असताना मिल्खा सिंग म्हणाले, 'मै भी खुदा का बंदा हूँ'. ते वाक्य ऐकताच ते मौलवी क्षणभर थबकले. त्यांनी मिल्खा सिंग यांच्यासाठीही दुवा मागितली.. 'या अल्लाह इसे भी जीत बक्शे!'

त्या क्षणी दोन्ही देशातील धर्माच्या भिंती कोसळल्या. खालिक १०० मीटर शर्यतीचा चॅम्पियन होता पण मिल्खा सिंग 'लंबी रेस'चा घोडा होते. १०० मीटर अंतरावर मिल्खा पाठी होते, पण नंतर त्यांनी खालिकला गाठले. पुढे १५० मीटरचे अंतर पार करायचे होते. मिल्खा यांनी ४०० मीटरची ती शर्यत २०.७ सेकंद या विक्रमी वेळेत पूर्ण केली. मौलवीचा आशीर्वाद मिल्खांसाठी लाभदायी ठरला. त्या क्षणापासून तमाम विश्वाने मिल्खा सिंग याला 'फ्लाइंग सिख' असे म्हणायला सुरुवात केली. भारतमातेचा हाच सुपुत्र शुक्रवारी रात्री १८ जूनला हा इहलोक सोडून गेला.

**क्लिक...क्लिक...!**



**मुरुड : प्रसिद्ध जंजिरा किल्ला पावसाळ्यामुळे पर्यटकांसाठी बंद आहे. समुद्राला मोठे उधाण आले की लाटा या किल्ल्याच्या बुरुजापर्यंत उंच जाऊन धडकतात. त्याची सुधीर नाझरे यांनी टिपलेली छबी.**

## आरोग्य प्रहर

### पावसाळ्यात निरोगी राहण्यासाठी 'या' गोष्टी नक्की लक्षात ठेवा!

कडाक्याच्या उन्हापासून दिलासा मिळण्यासाठी लोक पावसाळ्याची आतुरतेने वाट पाहत आहेत. पावसाळा लवकर यावा, जेणेकरून या कडक उन्हापासून थोडासा दिलासा मिळेल आणि हवामानाचा आनंदही घेता येईल, असे अनेकांना वाटत आहे, पण निरोगी राहण्यासाठी पावसाळ्यात काही गोष्टींची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.



खरंतर मान्सून कधीच एकटा येत नाही, तो सोबत संसर्ग आणि ॲलर्जीसारख्या समस्या घेऊन येतो. कारण उन्हाळ्यात टिकून राहिलेली उष्णता थंड आणि ओल्या हवामानात बदलते. या विषयावर एका वृत्तसंस्थेशी बोलताना वोक्हार्ट हॉस्पिटलचे अंतर्गत औषध सल्लागार आणि डॉक्टर अनिकेत मुळ्ये म्हणाले, मान्सूनच्या आगमनापूर्वी आपले शरीर ऋतू बदलासाठी तयार केले पाहिजे, जेणेकरून आपण कोणत्याही प्रकारचे संक्रमण, ॲलर्जी आणि रोगापासून स्वतःचे संरक्षण करण्यात यशस्वी होऊ शकता. यासाठी तुम्हाला कोणत्या गोष्टींकडे लक्ष देणे आवश्यक आहे हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे.

जेव्हा उन्हाळ्यातील उष्ण हवामान ओले आणि थंड हवामानात बदलते तेव्हा आपण दररोज काही वेळ व्यायाम करणे आवश्यक आहे. यामुळे तुमची प्रतिकारशक्ती वाढण्यास मदत होईल, तुमचे रक्ताभिसरण बरोबर होईल तसेच हृदयही चांगले काम करेल. यासाठी तुम्ही चालणे, राशी उड्या मारणे, सायकलिंग आणि धावणे यासारख्या व्यायामांचा तुमच्या दैनंदिन दिनचर्येत समावेश करू शकता.

पावसाळा हा सूक्ष्मजीवांच्या वाढीचा काळ असतो. त्यामुळे संसर्ग, ॲलर्जी आणि विषाणूजन्य ताप यासारख्या समस्या वेगाने पसरतात. ते टाळण्यासाठी, आपण निरोगी आहार घेणे महत्वाचे आहे. यासाठी ताजी फळे, भाज्या, संपूर्ण धान्य, शेंगा आणि कडधान्यांचा आहारात समावेश करा. तसेच हळद, आले आणि लसूण यांचा आहाराचा भाग बनवा. निरोगी राहण्यासाठी सकस आहार घेणे आवश्यक आहे तसेच मसालेदार, तेलकट, जंक, रस्त्यावरील आणि पॅकबंद खाद्यपदार्थांपासून मद्यपान आणि धूम्रपानापासून दूर राहणे आवश्यक आहे. यासोबतच जंतूपासून मुक्त होण्यासाठी भाज्या गरम पाण्याने धुण्यास विसरू नका. अतिसार किंवा अपचनाची समस्या असल्यास ओआरएसचा उपाय करून प्या. हे तुमच्या शरीरातील इलेक्ट्रोलाइट शिल्लक पुनर्संचयित करण्यात मदत करेल. या ऋतूत शरीराला हायड्रेट ठेवण्याचीही गरज असते. यासाठी पुरेसे पाणी प्या, जेणेकरून तुमच्या शरीरातून विषारी पदार्थ बाहेर पडू शकतील.




# मुंबई विभागात रायगड अव्वल

## जिल्ह्याचा दहावीचा निकाल ९७.३५ टक्के

**अलिबाग : प्रतिनिधी**

**महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेत रायगड जिल्ह्याचा निकाल ९७.३५ टक्के लागला. रायगडने यंदा मुंबई विभागात अव्वल येण्याचा मान मिळवला आहे. यंदा बारावीच्या परीक्षेतदेखील रायगडने मुंबई विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. जिल्ह्यात म्हसळा तालुक्याचा सर्वाधिक ९९.०२ टक्के निकाल लागला. यंदादेखील दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्याचा मुलींनीच बाजी मारली आहे. ९८.१२ टक्के मुली उत्तीर्ण झाल्या. ९६.६५ टक्के मुले उत्तीर्ण झाले.**

| मुंबई विभागाचा निकाल | |
|---|---|
| ठाणे | ९७.१३ |
| पालघर | ९७.१७ |
| बृहन्मुंबई | ९६.३० |
| मुबईउपनगर १ | ९६.७२ |
| मुबईउपनगर २ | ९६.६४ |
| रायगड | ९७.३५ |

रायगड जिल्ह्यात ३५१९५ विद्यार्थ्यांनी दहावीच्या परीक्षेसाठी नाव नोंदविले होते. ३४९९१ विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला बसले. त्यापैकी ३४०६७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. रायगडचा निकाल ९७.३५ टक्के लागला. ११५२७ विद्यार्थी विशेष श्रेणीस उत्तीर्ण झाले.१४७२५ विद्यार्थ्यांना प्रथमवर्ग मिळाला. ६६८९ विद्यार्थी व्दितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले. ११२६ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले.

दहावीच्या परीक्षेत उत्तीर्ण होण्यात यंदादेखील रायगड जिल्ह्यात मुलींनी मुलांना मागे टाकले आहे. मुलांची उत्तीर्ण होण्याची सरासरी ९६.९८ टक्के आहे तर मुलींची उत्तीर्ण होण्याची सरासरी ९८.१२ टक्के आहे. १८२६२ मुले परीक्षेला बसली होती त्यातील १७६५१ मुले उत्तीर्ण झाले. १६७२९ मुली परीक्षेला बसल्या होत्या. त्यापैकी १६४१६ मुली उत्तीर्ण झाल्या. म्हसळा तालुक्याचा सर्वाधिक ९९.०२ टक्के तर मुरुड तालुक्याचा सर्वात कमी ९४.४३ टक्के निकाल लागला.

**रायगडची तालुकानिहाय टक्केवारी**

**पनवेल ९७.६१ टक्के, उरण ९७.३५, कर्जत ९५.७८, खालापूर ९५.४०, सुधागड ९७.३९, पेण ९७.६४, अलिबाग ९८.६९, मुरुड ९४.४३, रोहा ९७.४१, माणगाव ९७.३६, तळा ९७.५९, श्रीवर्धन ९८.११, म्हसळा ९९.०२, महाड ९८.६०, पोलापूर ९७.१०.**

## कर्जत तालुक्याचा निकाल ९५.७८ टक्के

### ४९ पैकी २४ शाळांचा निकाल १०० टक्के

**कर्जत : बातमीदार**

मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेचा निकाल शुक्रवारी परीक्षा मंडळाने जाहीर केला. कर्जत तालुक्यात ४९ माध्यमिक शाळा असून त्यातील २४ शाळांचा निकाल १००टक्के लागला आहे. तर तालुक्याचा निकाल ९५.७८ टक्के लागला आहे.

दहावीची ऑफलाईन परीक्षा देण्यासाठी ३०२० विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज भरले होते. त्यापैकी २९९१ विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष परीक्षा दिली होती. २८६५ विद्यार्थी परीक्षेत यशस्वी झाले आहेत. त्यातील ७९७ विद्यार्थ्यांनी ७५ टक्क्याहून अधिक गुण मिळविले आहेत. तर ११६५ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले असून ७५४ विद्यार्थी द्वितीय श्रेणीमध्ये आणि १४९ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कर्जत तालुक्यातील ४९ पैकी तब्बल २४ शाळांमधील सर्वच्यासर्व विद्यार्थी यशस्वी झाल्याने त्या शाळांचा निकाल १०० टक्के लागला आहे. १०० टक्के निकाल लागलेल्या शाळांमध्ये कर्जत शहरातील शारदा मंदिर, स्वातंत्र्यसैनिक डोंबे निकेतन, विद्या विकास मंदिर तसेच नेरळ विद्या विकास मंदिर, आंबिवली माध्यमिक विद्यालय, गुंडगे येथील गुड शेफर्ड कॉन्व्हेन्ट स्कूल, भिमान्यी विद्यालय ऐनाचीवाडी, हजी लियाकत इंग्लिश स्कूल -नेरळ, माथेरान व्हॅली वंजारपाडा, भडवल येथील शेंडे पाटील विद्यालय, न्यू इंग्लिश मिडीयम स्कूल -पाषाने, व्ही. के. कोठडी स्कूल-नेरळ, दत्ता सामंत विद्यालय-वाकस, ज्ञानानुभव हायस्कूल-कशेळे, काळभैरव विद्यालय-किरवली, जय अंबे विद्यालय-भिसेगाव, प्रभाकर पाटील शाळा-बीड बुद्रुक, सरस्वती विद्या मंदिर-माथेरान, शासकीय आश्रमशाळा -चाफेवाडी, भालीवडी, पिंगळस या २४ शाळांचा समावेश आहे.

## मुरूड अंजुमन इस्लाम हायस्कूलचा निकाल ९६.९७ टक्के

**मुरुड : प्रतिनिधी**

दहावीच्या परीक्षेत मुरुड अंजुमन इस्लाम हायस्कूलचा निकाल ९६.९७ टक्के लागला आहे. या हायस्कूलचे ९९ विद्यार्थी परीक्षेला बसले होते. त्यातील ९६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यांपैकी ३२ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी मिळविली.

मदिहा जहुर लसने हिने ९३ टक्के गुण मिळवून हायस्कूलमध्ये प्रथम क्रमांक पटकावला. अस्मा रिझवान दामाद आणि आर्विया इर्शाद जमादार (९१.६०टक्के) यांनी दूसरा तर तहरीम अंसीर चोगले (९१.४०टक्के) हीने तृतीय क्रमांक मिळविला.

## खालापूर तालुक्याचा निकाल ९५.४० टक्के; २२ शाळांचा १०० टक्के निकाल

**खालापूर : प्रतिनिधी**

दहावी परिक्षेचा निकाल शुक्रवारी ऑनलाइन जाहीर झाला. खालापूर तालुक्याचा निकाल ९५.४० टक्के लागला आहे. तालुक्यातील ३८ शाळेतून २५९० विद्यार्थी दहावीच्या परिक्षेला बसले होते.त्यापैकी २४७१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. त्यापैकी ६९७ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य, ९९६ विद्यार्थ्यांनी प्रथम श्रेणी तर ६२९ विद्यार्थ्यांनी व्दितीय श्रेणी मिळविली आहे. तालुक्यातील सर्वात कमी निकाल (६१.९० टक्के) वडवळ येथील माध्यमिक विद्यालयोचा लागला आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा हर्षल मोडवे यांनी खालापूर येथील स्वामी विवेकानंद हायस्कूलमध्ये जाऊन यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.



## नांदगाव हायस्कूलमध्ये आदर्श खुळपे सर्वप्रथम

**मुरुड : प्रतिनिधी**

तालुक्यातील यशवंतनगर नांदगाव येथील श्री छत्रपती शिवाजी नूतन विद्यालयाचा दहावी परीक्षेचा निकाल ८८.४८ टक्के लागला आहे. १३९ विद्यार्थ्यांपैकी १२८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. ८१ टक्के गुण मिळवून आदर्श दत्तात्रेय खुळपे हा विद्यार्थी या विद्यालयात पहिला आला आहे. तर तपस्या म्हात्रे ही (७९ टक्के) दूसरी पारस कोतवाल (७७ टक्के) तिसरा आला.

अपंग विद्यार्थी संकल्प आग्रावकर याने ६०.६६ टक्के गुण मिळविले असून, पहिल्याच प्रयत्नांत त्याने हे यश संपादित केले आहे. या शाळेचे चेअरमन फैरोज घलटे, मुख्याध्यपक चिंतामणी जोशी, पर्यवेक्षक उत्तमराव वाघमोडे यांच्यासह सर्व संचालक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

## अलिबाग येथील देशमुख इंग्रजी माध्यम शाळेचे सुयश

**अलिबाग : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे मार्च २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता दहावी परीक्षेचा निकाल शुक्रवारी जाहीर करण्यात आला. या निकालामध्ये कोकण एज्युकेशन सोसायटीच्या अलिबाग येथील नंदा देशमुख इंग्रजी माध्यम शाळेने घवघवीत यश संपादीत केले आहे. शाळेचा निकाल ९९.२७ टक्के लागला आहे.

दिव्या संकलेचा हिने ९६ टक्के गुण मिळवत शाळेत प्रथम क्रमांक पटकावला. तर यश चाळेकर याने ९२.६० टक्के गुण मिळवत व्दितीय, संयोगीता कोळी हिने ९२.४० टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक प्राप्त केला आहे. श्रुती सुर्यवंशी हिने ९१.६० टक्के गुण मिळवत चतुर्थ क्रमांक तर जैताली ढवळे ९०.६० टक्के मिळवत पाचवा क्रमांक पटकावला आहे. सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे शाळा व्यवस्थापन समितीचे चेअरमन, सदस्य, मुख्याध्यापिका, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.


### जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत **श्री. गोविंद केशवराव कदम** यांच्याकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीच्या मालकी हक्काची खात्री करून घेण्याकरिता सदर नोटीस प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**परिशिष्ट**

**मौजे - कोयनावेळे, तालुका - पनवेल, जिल्हा - रायगड.**

| गट नं. / हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| २९/५ | ०-८६-००<br>पो.ख. ०-०३-००<br>**एकूण ०-८९-००**<br>**पैकी ०-४४-५०** | ६.८१ |

वरील वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापूर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधित व्यक्ती, सरकारी/निमसरकारी/खाजगी संस्था यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहीत खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरून सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

**पनवेल.**
**दि. १७/०६/२०२२.**

**सही/-**
**ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
**कार्यालय :** २, आशादिप अपार्टमेंट, वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
दूरध्वनी क्र. २७४५६३०६


## खोपोलीत झाड पडले रस्त्यावर

### मुंबई-पुणे महामार्ग जाम!

**खोपोली : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे जुन्या महामार्गावर स्टेट बँकेच्या खोपोली शाखेसमोर शुक्रवारी (दि. १७) सायंकाळी साडेचारच्या सुमारास जुना वृक्ष उन्मळून पडला. त्यावेळी तेथून जाणारे दोन दुचाकीस्वार सुदैवाने बचावले, दरम्यान, या घटनेनंतर शिळफाटा येथे जाणारी त्याचप्रमाणे खोपोली शहरात जाणारी वाहतूक काही काळासाठी बाधीत झाली होती.

खोपोलीतील व्यापारी नंदू ओसवाल आणि अपघातग्रस्त मदत टीमचे हनिफ करंजीकर यांनी या घटनेची माहिती सोशल मीडियावर वायरल करताच महामार्गावरील आयबी यंत्रणा घटनास्थळी दाखल झाली. त्यांनी व शिळफाटा येथील तरुण मंडळींनी ते झाड बाजूला करण्यासाठी शर्तीचे प्रयत्न केले. सुमारे अर्ध्या तासानंतर महामार्ग मोकळा करण्यास यंत्रणेला यश आले, पण तोपर्यंत रस्त्याच्या दोन्हीबाजूला वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.




### जाहिर नोटीस

ॲड. राहुल तुळशीराम पाटील
मे. गोडसे सा. कोर्ट
७२०८२३२४४४

**पनवेल येथील मे. दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांचे कोर्टात**

दिवाणी चौकशी अर्ज क्र. ७०१/२०२२
नि.नं. ७/ड
ने. ता. १२/०७/२०२२

**श्रीमती. उर्मिला गणेश पाटील व इतर ३ ... अर्जदार**
**विरुद्ध**
**कोणीही नाही ... सामनेवाला**

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीदारे कळविण्यात येते की, के. गणेश गजानन पाटील, दिनाक १०/१२/२०२१ रोजी मौजे-दापोली, ता. पनवेल, जि. रायगड येथे मृत्यू पावले असून त्यांचे खालील वर्णनाची मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेकरीता अर्जदार यानी सदरचा अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| अ. क्र. | गाव/सेक्टर | फ्लॅट क्र. | इमारतीचे नाव / प्लॉट क्र. | क्षेत्रफळ | मजला |
|---|---|---|---|---|---|
| १ | दापोली | १९६ बी | | ५८० चौ.फूट | |
| २ | उलवे, सेक्टर १७ | फ्लॅट क्र. ५ | कृष्णा हाईटस/प्लॉट क्र.४० | २१.०६ चौ. मी. | तळमजला |
| ३ | उलवे, सेक्टर १७ | फ्लॅट क्र. १०४ | कृष्णा हाईटस/प्लॉट क्र.४० | ७०.१०८ चौ.मी कारपेट, १२.०७ चौ. मी. टेरेस | पहिला मजला |
| ४ | उलवे, सेक्टर १७ | फ्लॅट क्र. ३०१ | कृष्णा हाईटस/प्लॉट क्र. ४० | ४७.७३ चौ. मी. | तिसरा मजला |
| ५ | उलवे, सेक्टर १७ | फ्लॅट क्र. ४०३ | कृष्णा हाईटस/प्लॉट क्र. ४० | ७०.८२१ चौ. मी. | चौथा मजला |
| ६ | उलवे, सेक्टर १७ | फ्लॅट क्र. ८०२ | कृष्णा हाईटस/प्लॉट क्र. ४० | ४७.७३ चौ. मी. | आठवा मजला |

वरील मिळकतीबाबत अर्जदार है कै. गणेश गजानान पाटील याचे कायदेशीर वारस आहेत. त्यांच्या हक्काबाबत कोणीही व्यक्तीस हरकत घ्यावयाची असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या मे. कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून अगर त्यांच्या वकीलामार्फत त्यांच्या हरकती सादर कराव्यात. विहीत मुदतीमध्ये हरकत सादर न केल्यास ना. कोर्ट योग्य त्या पुराव्यानीशी वरील अर्जदार यांस वारस दाखला प्रदान करतील मुदतीनंतर येणाऱ्या हरकती ग्राह्य धरल्या जाणार नाहीत.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आज दि. १३ माहे जून सन २०२२ रोजी माझ्या सहीने व या मे. कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

कोर्टाचा शिक्का

**सही/-**
**सहाय्यक अधिक्षक**
**दि. न्यायाधिश वरीष्ठ स्तर. पनवेल**



### उप विभागीय अधिकारी, माणगांव यांजकडून,

क्रमांक-उविअमा-भूसं/कात-२/एस.आर.९५/२०१२

ज्याअर्थी, महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम, १९६१(१९६२ चा महा-तीन) चे कलम एक, पोट कलम (३) अन्वये काढण्यात आलेली व दिनांक २ जून २०२२ च्या महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र, भाग चार ब पृष्ट क्र. ३ वर प्रसिध्द करण्यात आलेली दिनांक २७ मे २०२२ ची शासकीय

अधिसुचना, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग क्र.आय डीसी/२०१९/प्र.क्र ३७०/उ-१४ उक्त अधिनियमाच्या प्रकरण सहाचे उपबंध हे त्या अधिसूचनेच्या अनुसूचित विनिर्दीष्टी करण्यात आलेल्या क्षेत्रात जून २०२२-महिन्याच्या दुसऱ्या दिवसापासून अंमलात येतील असा महाराष्ट्र शासनाने निर्देश दिला आहे,

आणि ज्याअर्थी, या सोबतच्या अनुसूचीत नमूद केलेल्या जमिनी उक्त प्रकरण सहाचे उपबंध उपरोक्ताप्रमाणे अंमलात आले आहेत अशा क्षेत्रांत आहेत,

आणि ज्याअर्थी, अधिनियमाचे प्रकरण सहा हे ज्या क्षेत्रांना लागू करण्यात आले आहेत अशा क्षेत्रांत असणाऱ्या आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळमार्फत (त्यात यानंतर ज्याचा "उक्त महामंडळ" असा निर्देश करण्यात आला आहे) विकास करण्याच्या प्रयोजनार्थ किंवा उक्त अधिनियमांच्या उद्दिष्टांच्या पुष्ट्यर्थ असेल अशा इतर कोणत्याही प्रयोजनार्थ आवश्यक असणाऱ्या जमिनी संपादन करण्याची शक्ती उक्त अधिनियमांच्या कलम ३२ अन्वये राज्यशासन प्रदान करण्यात आली आहे,

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनिमयाचे कलम २, खंड (क) अन्वये काढण्यात आलेली आयडीसी /१८९२ (१७४४१), उद्योग -१४, दि.११ जून १९९३ अन्वये राज्यशासनाच्या महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६२ यांचा नियम २८ अन्वये ही जी कामे जिल्हाधिकाऱ्यांकडे सोपविण्यात आले आहेत अशी उक्त अधिनियमाचे कलम ३२, कलम ३३ पोटकलम (२), कलम ३६ व कलम ३८ खालील जिल्हाधिकाऱ्यांची कामे पार पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, माणगांव यांची नेमणूक केली आहे,

आणि ज्याअर्थी, औद्योगिक क्षेत्र म्हणून विकसित करण्यासाठी सोबतच्या अनुसूची मध्ये वर्णन केलेल्या जमिनी महामंडळास आवश्यक आहे असे उप विभागीय अधिकारी, माणगांव यांचे मत झाले आहे.

आणि ज्याअर्थी मा. जिल्हाधिकारी रायगड यांनी त्यांचे कडील पत्र क्र. भूसंपादन/टे.६/२६९३०७/२०१४, दि.११/०८/२०१४ अन्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने निश्चित केलेल्या भूसंपादन धोरणास आणि मोबदल्या प्रती देय असलेल्या तरतूदीची प्रसिध्दी केली आहे.

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम ३२ पोटकलम (२) अन्वये उपरोक्त प्रमाणे प्रदान करण्यात आलेल्या राज्य शासनाच्या शक्तीचा वापर करुन याद्वारे उप विभागीय अधिकारी, माणगांव खाली नमूद केलेल्या जमिनीमध्ये भू-धारका शिवाय इतर कोणत्याही व्यक्तिचा हितसंबंध आणि कोणताही अधिकार असणाऱ्या सर्व व्यक्तींना खाली उल्लेख केलेल्या जमिनी मध्ये उक्त प्रयोजनार्थ का संपादन करण्यात येवू नयेत या संबंधी ही नोटीस प्रसिध्द झाल्याच्या तारखे पासून ३० दिवसाच्या आत खाली सही करणाऱ्यास लेखी स्वरुपात कारणे दाखविण्या बद्दल नोटीस देत आहे.

या नोटीसीचे तारीखेनंतर जिल्हाधिकाऱ्यांच्या मंजूरीशिवाय विक्री करुन, पट्ट्याने देऊन, गहाण ठेवून अभिहस्तांकन करुन, आणि अदलाबदल करुन किंवा अन्य रितीने करावयाच्या उक्त जमिनीच्या/जमिनींच्या विल्हेवाटी संबंधी केलेला कोणताही करार किंवा तीवर केलेला कोणताही खर्च किंवा ती मध्ये/त्यामध्ये केलेल्या सुधारणा उक्त जमिनीच्या अंतिमत: संपादन करण्यात येतील अशा भागांसंबंधी भरपाई निर्धारित करण्याच्या अधिकाऱ्यांकडून उक्त अधिनियमाचे कलम ३३, पोटकलम (पाच) व भूमी संपादन अधिनियम, १८९४ (१८९४ चा एक ला ) यांच्या कलम २४ (सातव्यांदा) अन्वये विचारात घेतल्या जाणार नाहीत.

ज्यांची व्यक्तीगत सुनावणी करण्याची इच्छा असेल आशा कोणत्याही व्यक्तीस या नोटीसीचे तारखे पासून एक महाच्या आत भेटीची वेळ ठरवून कोणत्याही कामाच्या दिवशी सकाळी ११.०० ते १.०० वाजेपर्यंत खाली सही करणाऱ्यांच्या कार्यालयात माणगांव येथे समक्ष जातीने किंवा आपल्या कायदेशीर मुखत्यारामार्फत हजर रहाता येईल.

**अनुसूची**
**पाणसई औद्योगिक क्षेत्र**
**जिल्हा-रायगड, ता. माणगांव,**
**गांव-कोशिंबळे, त. निजामपूर**

| अ.क्र. | सं./गट नं. | हि. नं. | एकूण क्षेत्र (हे. आर.) |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| १ | ३४ | ० | ०.०४३ |
| २ | ४५ | ० | ०.१४० |
| | **एकूण क्षेत्र** | | **०.१८३** |

ठिकाण :- माणगांव
दिनांक :- /०६/२०२२

क्र.जिमाका/राअ/
जाहि./५८/२०२२-२३

सही/-
(प्रशाली जाधव-दिघावकर)
उप विभागीय अधिकारी,
माणगांव विभाग माणगांव

# मूर्तिकारांच्या प्रश्नावर प्रशासन उदासीन

## विविध प्रश्न सोडविण्याची मागणी

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबईतील स्थानिक मूर्तिकार मागील कित्येक वर्षांपासून मूर्ती घडविण्यासाठी तसेच मूर्ती विक्रीसाठी प्रशासनाकडे कायमस्वरूपी वा तात्पुरती स्वरूपात जागा मागत आहेत. मात्र याकडे स्थानिक प्रशासन दुर्लक्ष करत आहे. शहरात बाहेरून येणारे व्यापारी बेकायदेशीरपणे मूर्ती विक्री करत असतात, अशा विक्रेत्यांवर कडक कारवाई करण्यात यावी. शाडो मूर्तीसाठी त्वरित जागा उपलब्ध करून द्यावी आदी विविध प्रश्नांसाठी नवी मुंबईतील मूर्तिकार नवी मुंबई मनपा आयुक्त यांची सोमवारी भेट घेणार आहेत.

गणेशोत्सव अवघ्या काही महिन्यांवर येऊन ठेपला आहे. नवी मुंबई शहरातील स्थानिक मूर्तिकार यांनी घडविण्याच्या कामाला सुरुवात केली आहे. मात्र सध्या शहरातल्या स्थानिक मूर्तिकारांची जागेअभावी कुचंबना होत आहे. गेल्या अनेक वर्षापासूनचा जागेचा प्रश्न आजही जैसे थे आहे. नवी मुंबईतील गणेश मूर्तिकारांना दरवर्षी जागेचा शोध घ्यावा लागतो. जागेअभावी अनेकांना आपल्या परंपरेनुसार चालत आलेली कला जिवंत ठेवण्यासाठी जादा भाडे देऊन तीन-चार महिन्यांसाठी जागा भाडेतत्वावर घ्यावी लागते. याबाबत नवी मुंबई गणपती मूर्तिकार संस्थेच्या वतीने सिडको व पालिका प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करून ही त्यांना अल्प भाड्यात जागा उपलब्ध होत नाही. आजमितीला शहरात शंभराहून अधिक मूर्तिकार मूर्ती घडवत आपली पूर्वापार चालत आलेली कला जोपासत आहेत. मात्र मुख्य समस्या या कलाकारांना जागेची असल्याने दरवर्षी त्यांना मुर्त्या घडविण्यासाठी जागेचा शोध घ्यावा लागतो. यावर्षीदेखील अशीच परिस्थिती त्यांच्यासमोर उभी राहिली आहे. सिडकोकडून कलाकारांसाठी आर्टिस्ट व्हिलेज,



अर्बन हार्ट सारख्या वास्तूंची निर्मिती केली आहे. मात्र मूर्तिकारांसाठी जागा उपलब्ध करत नसल्याची नाराजी मूर्तिकारांकडून व्यक्त केली जात आहे.

पावसाळ्यात कुठे तरी अडगळीच्या ठिकाणी जागा उपलब्ध होते खरी मात्र त्या जागेचे भाडेदेखील भरमसाठ असल्याने नाईलाजास्तव ते भाडे मूर्तिकारांना द्यावे लागते. दिवाळी किंवा इतर महोत्सवासाठी पालिका व सिडको ज्याप्रमाणे संबंधित यांना जागा भाडेतत्वावर देते, त्याच पद्धतीने आम्हालाही किमान चार महिन्यांसाठी जागा उपलब्ध करुन् द्यावी अशी मागणी मूर्तिकारांकडून केली जात आहे. जागेअभावी अनेक मूर्तिकारांनी सार्वजनिक मंडळातील मुर्त्या घडविणे बंद केले आहे. आता ते फक्त घरगुती मुर्त्या बनवित आहेत. स्वतंत्र भूखंड विकत घेणे मूर्तिकारांच्या आवाक्याबाहेर आहे.

मात्र ना नफा ना तोटा या तत्वावर त्यांना आपली कला जिवंत ठेवावी लागत आहे. त्यातच शहराबाहेरील पेण, अमरापूर, जोहे, कळवा आदी ठिकाणी असणाऱ्या धंदेवाईक व्यापाऱ्यांचे नवी मुंबईतील मूर्तीच्या बाजारपेठेमध्ये आक्रमक होत असते.प्रशासन याकडे दुर्लक्ष का करीत असते? असा प्रश्न असून आयुक्तांची भेट घेणार असे मूर्तिकार संस्थेचे अध्यक्ष संतोष चौलकर यांनी सांगितले.

### जागेसाठी दरवर्षी भटकंती

***स्थनिक मूर्तिकार शाडो मूर्ती बनविण्यासाठी प्राधान्य देत असतात. मात्र आपली कला जोपासण्याचा अडचणी निर्माण होत आहेत. गेल्या चार दशकांपासून दिघा ते बेलापूर पर्यंत मूर्ती घडविण्याची काहींना विक्री साठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यांना हक्काची अशी जागा मिळत नसल्याने दरवर्षीप्रमाणे त्यांना जागेसाठी भटकंती करावी लागते. कोपरखैरणे येथील मूर्तिकार तथा नवी मुंबई गणपती मूर्तिकार संस्थेचे अध्यक्ष संतोष चौलकर हे अनेक वर्षे सिडको व पालिकेकडे भाडेतत्वावर जागा उपलब्ध व्हावी यासाठी पाठपुरावा करत आहेत,मात्र प्रशासनाकडून प्रकारचा प्रतिसाद मिळत नसल्याने त्यांनी सांगितले.***

# भंगार गोदामाला लागलेल्या आगीत मोठे नुकसान

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुक्यातील तळोजा येथील भंगार गोदामाला लागलेल्या आगीत मोठे नुकसान झाले असून सुदैवाने जिवितहानी झालेली नाही.

तळोजात असलेल्या भंगार गोदामात प्लास्टिकसह लाकडी आणि इतर सामान मोठ्या प्रमाणात ठेवण्यात आले होते. तेथे मध्यरात्री २च्या सुमारास अचानकपणे आग लागून मोठ्या प्रमाणात असलेले भंगार साहित्य भस्मसात झाले आहे. आगीची माहिती मिळताच अग्निशमन दलाचे तळोजा, नवी मुंबई, कळंबोली, पनवेल बंब घटनास्थळी जाऊन पोहचले व त्यांनी पाच तास शर्थीचे प्रयत्न करून आग आटोक्यात आणली आहे.



## सुमन साळुंखे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ वडघरमध्ये मोफत वह्या वाटप कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**

स्वाभिमानी युथ रिपब्लिकन पक्षाचे रायगड जिल्हा अध्यक्ष महेश साळुंखे यांच्या मातोश्री सुमन लक्ष्मण साळुंखे यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रा. जि. प. मराठी शाळा वडघर व लांगेश्वर विद्यामंदिर पनवेल येथे मोफत वह्या वाटपाचा कार्यक्रम झाला. शाळा सुरू झाल्याच्या दुसऱ्याच दिवशी मोफत वह्या मिळाल्यामुळे विद्यार्थी व पालक वर्गामध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले.

दरवर्षी महेश साळुंखे गरीब परिवारातील विद्यार्थ्यांच्या अडचणी समजून घेउन त्यांना मोफत वह्या, शैक्षणिक साहित्य व गणवेशाचे वाटप करतात. या कार्यक्रमाकरिता प्रमुख पाहुणे म्हणून उद्योजक भीमसेन माळी, बांधकाम व्यावसायिक तुकाराम दुधे, डॉ. अमेय शेटे, राजेश खुटले, शाळा व्यवस्थापन समिती उपाध्यक्ष सोनाली साळुंखे, दिलीप नाईक, नरेश परदेशी, अविनाश अडांगळे , शशिकांत कळवेकर, भारत दाताड, मयुरेश गायकवाड, मुमताज पठाण, जयश्री पाटोळे, मुख्याध्यापिका माधुरी चौधरी, शिक्षक जयदास घरत, जनार्दन पाटील, पालकवर्ग, ग्रामस्थ उपस्थित होते.



## पनवेलमध्ये मान्सूनपूर्व आपत्ती व्यवस्थापनाचे मॉकड्रील

**पनवेल : वार्ताहर**

पावसाळा तोंडावर आल्याने अशा वेळी कुठल्याही प्रकारची घटना घडल्यास त्याला तोंड देण्यासाठी पनवेल शहर पोलिसांचे पथक सज्ञ असल्याचे पनवेलकरांना दाखवायच्या उद्देशाने आज शहरातील कोळीवाडा गणपती विसर्जन घाट येथे मॉकड्रील करण्यात आले.

पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कादबाने यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक शिंदे व पोलीस निरीक्षक संजय जोशी यांच्यासह इतर पोलीस



अधिकारी व कर्मचारी वर्ग, अग्निशमन दलाचे पथक आणि कोळी बांधव यांच्या साथीने मॉकड्रील करून विविध प्रात्याक्षिके सादर करण्यात आली. तसेच नागरिकांनाही अशा स्थितीत सहकार्याचे आवाहन केले.

## प्रवासादरम्यान विसरलेला मोबाइल रिक्षाचालकाने केला परत

**नवी मुंबई : वार्ताहर**

तुर्भे नाका येथून चुन्ना भट्टी -बोनसरी गाव येथे जाण्यासाठी फुलचंद चौधरी नावाचा प्रवाशी रिक्षाचालक रमेश मोरे यांच्या रिक्षामध्ये बसला व प्रवासादरम्यान ठरल्याप्रमाणे आपले भाडे देऊन रिक्षामधून उतरून निघून गेला. परंतु या प्रवासादरम्यान त्याचा विवो कंपनीचा १६ हजार ५०० किमतीचा मोबाईल रिक्षामध्ये तो विसरला होता. रिक्षाचालक देखील आपले भाडे घेऊन त्या ठिकाणाहून निघून गेला होता. काही वेळानंतर रिक्षा चालक आपली रिक्षाची साफसफाई करत असताना त्याला पाठीमागील सिटवर विवो कंपनीचा मोबाईल आढळून आला. रिक्षाचालक रमेश मोरे यांनी कुठलाही मोह न बाळगता ही बाब सामाजिक कार्यकर्ते दिपक गायकवाड यांना कळवली व त्या प्रवाशाचा मोबाईल परत करण्याचा निर्णय घेतला व त्या मोबाईलवर फोन येण्याची वाट पाहिली असता अर्धा तासानंतर फोन आल्यानंतर प्रवाशाने सांगितलेल्या ठिकाणावर कुठलाही मोबदला न घेता रिक्षाचालक रमेश मोरे व सामाजिक कार्यकर्ते दिपक गायकवाड यांनी जाऊन फुलचंद चौहान या प्रवशाला मोबाईल परत केला. या वेळी आपला मोबाईल परत मिळाल्याबद्धल प्रवाशाने व स्थानिक नागरिकांनी रिक्षाचालक रमेश मोरे यांचे आभार व्यक्त केले.



## सोनसाखळी चोरांपासून सतर्क राहा; पोलिसांचे नागरिकांना आवाहन

**कळंबोली : रामप्रहर वृत्त**

कळंबोली, पनवेल परिसरात सोनसाखळी चोरीच्या प्रकारांत वाढ झाली असून महिला वर्गाने प्रतिबंध, सतर्क राहावे, असे मार्गदर्शन परिपत्रक कळंबोली पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक संजय पाटील यांनी मंगळवारी (दि. १४) वटपौर्णिमेनिमित्त पूजेकरिता आलेल्या महिला याबरोबरच नागरिकांनाही करण्यात आले. त्यांना सतत जागृत राहण्याचे आवाहनही या वेळी पोलिसांनी केले.



सोनसाखळी चोरांबाबत माहिती देऊन प्रतिबंध होण्यासाठी सूचना दिल्या, तसेच परिपत्रक वाटप करून आजूबाजूचे महिलांना सांगण्याबाबत मार्गदर्शन केले. हद्दीतील सर्व पूजेचे ठिकाणी महिलांना परिपत्रक वाटप केले. दरम्यान, मॉर्निंग वॉकला जाणाऱ्या नागरिकांना चोरट्यांनी लक्ष केले आहे.

## पनवेलमध्ये रानभाज्यांची विक्री सुरू

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दोन दिवसांपासून हलक्या सरींनी तालुक्यात जोर धरला आहे. शेतकऱ्यांची पेरणीची कामे पूर्ण होऊ लागली आहेत. रानावनात झाडांना पालवी धरू लागली आहे. अशा वातावरणात सर्वांना ओढ लागते ती रानभाज्यांची. काही दिवसांपासून रानात रानभाज्यांना बहर आला असून पनवेलसह जिल्ह्यांतील बाजारपेठांत रानभाज्या विक्रीसाठी दिसत आहेत. आवक वाढल्याने प्रति जुडी १० रुपयांना मिळत आहे.

पावसाळ्यापूर्वी रानात कुडा, शेवला, आकुर इत्यादी रानभाज्या मोठ्या प्रमाणात उगवतात. या रानभाज्या खायला चविष्ट व पौष्टिक असतात. ठराविक ऋतूत येणाऱ्या या भाज्या खवय्यांच्या पसंतीच्या असल्याने त्यांना चांगली मागणी आहे. पावसाळा वाढत जाईल, तशा अनेक भाज्या तयार होणार आहेत. आदिवासी स्त्रिया रानावनात फिरून त्या मिळवितात. या भाज्या विकून त्यांना रोजगार मिळत असून, आर्थिक उत्पन्नाचे साधन उपलब्ध होत आहे. सध्या याच रानभाज्यांची आवक वाढल्यामुळे त्या स्वस्त झाल्या आहेत.

काही दिवसांपूर्वी ५० ते ६० रुपयांना तीन जुड्या मिळत होत्या. आता दहा रुपये प्रति जुडी मिळत आहे. पावसाळ्यात मिळणाऱ्या या भाज्या खरेदी करण्यासाठी प्रवासी व नागरिक आवर्जून थांबून खरेदी करत आहेत. या भाज्यांवर विशेष संस्कार करून शिजवाव्या लागतात. काही तर उकडून शिजवून द्याव्या लागतात. तर काहींमध्ये विशिष्ट प्रकारचा पाला मिसळावा लागतो. म्हणजे त्या खायला चवदार लागतात आणि बाधतही नाहीत.

> **रानात मिळणाऱ्या भाज्या या पावसाळ्याच्या सुरुवातीच्या दिवसातील आहेत. पाऊस जसजसा वाढत जाईल, तसतसे विविध भाज्या रानात मिळतील. पाच ते दहा रुपयांना जुडी विकली जाते.**
> **-येनू जाधव, विक्रेता**

> **पावसाळ्यात रानावनात तयार झालेल्या भाज्या चवदार असतात. त्या विविध प्रकारे शिजवल्या जात असून चविष्ट असतात.**
> **-चंद्रभागा खडतर, रानभाज्या तज्ज्ञ**



## अज्ञात चोरट्याने रोख रक्कम केली लंपास

**पनवेल : वार्ताहर**

अज्ञात चोरट्याने एका कार्यालयाचे लोखंडी दरवाजाचे कुलूप तोडून आतील रोख रक्कम लंपास केल्याची घटना तालुक्यातील काळुंद्रे गावात घडली आहे.

काळुंद्रे येथील श्री गणेश मंदिराच्या सभागृहालगत असलेल्या कार्यालयाचे लोखंडी दरवाजाचे कुलूप तोडून आतील ६२ हजाराची रोख रक्कम लंपास केली आहे.

## कोकण विभागात अत्यल्प पाऊस

**नवी मुंबई :** कोकण विभागात दि.१७ जून २०२२ रोजी सरासरी १४.८ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सर्वाधिक पावसाची नोंद सिंधुदुर्ग जिल्ह्यात १८.२ मि.मी. झाली आहे. कोकण विभागात आत्तापर्यंत एकूण ९८.० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. जिल्हानिहाय पाऊस ठाणे १०.८ मि.मी., पालघर-६.५ मि.मी, रायगड ९.९ मि.मी., रत्नागिरी १४.२ मि.मी., तअ सिंधुदुर्ग जिल्ह्यात १८.२ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे.

## वटपौर्णिमेला वटवृक्षाच्या रोपांची लागवड

### उरणमध्ये सावित्रींच्या लेकींचा अनोखा उपक्रम

**उरण : बातमीदार**

निसर्गाप्रति असणारी आस्था आणि प्रेम हे संपूर्ण परिवाराच्या हृदयात सामावलेले असणे हा दुर्मिळ योगायोग आहे. याचे एक उत्तम उदाहरण वन्यजीव प्रेमी केअर ऑफ नेचर सामाजिक संस्थेचे संस्थापक राजू मुंबईकर यांच्या सहचारिणी राणी मुंबईकर आणि सुजाता कडू व प्रतिक्षा म्हात्रे या निसर्गप्रेमी सोबतीणींच्या रूपाने पाहायला मिळाले आहे.

हिंदू संस्कृतीत ज्येष्ठ महिन्यात येणारी पौर्णिमा हा दिवस सर्व महिला भगिनी वटपौर्णिमा म्हणून साजरा करतात. या दिवशी विवाहित महिला आपल्या पतीला उत्तम आरोग्य आणि दीर्घायुष्य लाभावे याकरीता वडाच्या झाडाची मनोभावे पूजा करतात.

तसेच करत असताना मात्र राणी मुंबईकर या निसर्गप्रेमी सावित्रीने सुजाता कडू आणि प्रतिक्षा म्हात्रे यांच्या सोबतीने आणि सहकार्याने एक अनोखा संकल्प करत उरण येथील वेश्वी गावातील एकविरा देवी मंदिराच्या वाटेवर वटवृक्षाच्या झाडांची लागवड करून वटपौर्णिमा हा सण साजरा केला.



सण-संस्कृती सोबतच विज्ञानाची कास धरणाऱ्या ह्या सावित्रीच्या लेकीने वटवृक्षांची लागवड करत पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच ऑक्सिजन रुपी नवसंजीवनी देणाऱ्या वृक्षांची लागवड करून समाजात एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

दरम्यान, या अनोख्या पध्दतीने निसर्गासोबत पर्यावरणपूरक धाग्याची वीण विणत नैसर्गिक, धार्मिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोनातून महत्त्व असणाऱ्या वटवृक्षाची लागवड करून वटपौर्णिमा साजरी करणाऱ्या केअर ऑफ नेचर संस्थेच्या निसर्गप्रेमी सावित्रींच्या कार्याचे सर्व स्तरातून विशेष कौतुक केले जात आहे.

# काँग्रेस कार्यकर्त्यांचा जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात धुडगूस

**अलिबाग : प्रतिनिधी**

खासदार राहुल गांधी यांच्यावर सुरू असलेल्या ईडीच्या कारवाईला विरोधात करण्यासाठी निदर्शने करणाऱ्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी शुक्रवारी (दि. १७) थेट रायगड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारात घुसून धुडगूस घातला. त्यामुळे तणाव निर्माण झाला होतो. पोलिसांनी हस्तक्षेप करून या कार्यकर्त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातून बाहेर काढले. अलिबागेत काँग्रेस कार्यकर्ते पहिल्यांदाच आक्रमक झाल्याचे दिसले.

रायगड जिल्हा काँग्रेस, युवक काँग्रेस आणि महिला आघाडी यांच्यातर्फे शुक्रवारी अलिबाग येथील जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला होता. राहुल गांधी यांच्यावर ईडीने जी कारवाई सुरू केली आहे, ती बेकायदेशीर असल्याचा काँग्रेसचा दावा असून त्याविरोधात हे आंदोलन होते. अलिबागेतील काँग्रेस भवन येथून निघालेला हा मोर्चा हिराकोट तलावाजवळ अडवण्याचा पोलिसांचा प्लॅन होता, परंतु तेथील बॅरीगेटस बाजूला करून काँग्रेस कार्यकर्ते जिल्हाधिकारी कार्यालयाकडे निघाले. तेथील पोलिसांना न जुमानता कार्यालयाचे गेट ढकलून त्यांनी थेट पायरीजवळ ठिय्या मांडला. तेथे या कार्यकर्त्यांनी धुडगूस घातला. पोलिसांनी या कार्यकर्त्यांना जिल्हाधिकारी कार्यालयाच्या आवारातून बाहेर काढले. त्यानंतर त्यांनी गेटसमोर ठिय्या मांडला. अखेर पोलिसांच्या विनंतीवरून काँग्रेस कार्यकर्त्यांनी आंदोलन मागे घेतले.

काँग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्र घरत यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात महिला जिल्हाध्यक्षा ॲड. श्रध्दा ठाकूर, प्रदेश सचिव ॲड. प्रवीण ठाकूर, वरिष्ठ उपाध्यक्ष राजेंद्र ठाकूर, जिल्हा उपाध्यक्ष अनंत गोंधळी, जिल्हा उपाध्यक्ष सुनील थळे, अलिबाग तालुका अध्यक्ष योगेश मगर, युवक काँग्रेसचे ॲड. प्रथमेश ठाकूर, आकाश राणे, नंदा म्हात्रे, कौस्तुभ पुनकर आदिंसह कार्यकर्ते सहभागी झाले होते.



# पिंगळस गावातील विहिरीत पाणीच नाही

## नवीन नळ योजनेचे तीन तेरा

**कर्जत : बातमीदार**


तालुक्यातील मोग्रज ग्रामपंचायत हद्दीतील पिंगळस गावातील नळ पाणीयोजनेची विहीर ३० फूट खोल खोदूनदेखील कोरडीच राहिली आहे. त्यामुळे या विहिरीवर केलेल्या नळ पाणी योजनेचे तीन तेरा वाजले आहेत. कोरड्या विहिरीच्या कामाचे बिल ठेकेदार कंपनीला अदा करू नये, अशा मागणीचे निवेदन पिंगळस ग्रामस्थांनी जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाकडे दिले आहे.

पिंगळस हे गाव कशेळे–आंबिवली रस्त्यावर असून या गावात ४६ घरांची वस्ती आहे. येथील ग्रामस्थ धोत्रे रस्त्यावर असलेल्या विहिरीमधील पाणी आणून तहान भागवत असतात. पिंगळस ग्रामस्थांनी स्थानिक आमदार थोरवे यांच्याकडे २०२०मध्ये नळ पाणीयोजनेची मागणी केली होती. त्यावेळी, आधी विहीर खोदू आणि नंतर त्या विहिरीचे पाणी गावापर्यंत आणून नळाद्वारे घरोघरी पोहचवू असे आश्वासन आमदार थोरवे यांनी दिले होते.

जिल्हा नियोजन मंडळमधून २२लाख रुपयांचा निधी पिंगळस नळ पाणीयोजनेसाठी मंजूर झाला. त्यात विहीर खोदणे आणि नंतर विहिरीतील पाणी गावात आणून घरोघरी पोहचवणे असे काम मंजूर झाले. २०२२ मध्ये प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. ठेकेदाराने ग्रामस्थांचा म्हणाण्याकडे दुर्लक्ष करून गावापासून ९०० मीटर अंतरावर फणसवाडी येथे नाल्याच्या बाजूला विहिरीचे काम सुरू केले. आता जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात विहिरीचे काम पूर्ण झाले असून त्या विहिरीत अर्धा फूटदेखील पाणी नाही. त्यामुळे विहिरी खोदलेल्या कामाचे बिल ठेकेदाराला अदा करू नये, अशी मागणी ग्रामस्थांनी जिल्हा परिषद लघुपाटबंधारे विभागाकडे केली आहे.

**काही दिवसांपूर्वी आपण स्वत: फणसवाडी येथे सुरू असलेल्या कामाची पाहणी केली होती. त्यावेळी विहिरीत बऱ्यापैकी पाणी होते. मे अखेरीस सर्वच विहिरी तळ गाठतात. ग्रामस्थांच्या तक्रारीनुसार पुन्हा जावून पाहणी करू**

**–सुरेश इंगळे, उपअभियंता, जिल्हा परिषद लघुाटबंधारे विभाग**



# रेल्वे प्रवासात महिलेचे मंगळसूत्र गेले चोरीला

**खोपोली : प्रतिनिधी**

रेल्वे प्रवासात झोपलेल्या महिलेच्या गळ्यातील एक लाख ५५ हजार रुपये किंमतीचे मंगळसूत्र चोरट्यांनी खिडकीतून हात घालून चोरुन नेल्याची घटना मंकिहिल स्टेशन येथे घडली आहे.

**खोपोली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल**

आंध्रप्रदेश येथील महिला कोणार्क एक्सप्रेस गाडीने प्रवास करीत होती. गाडी रात्री दोनच्या सुमारास मंकीहिल स्टेशन येथे सिग्नलमुळे थांबली असताना बाहेरुन अज्ञात लाल टिशर्ट घातलेल्या इसमाने खिडकीतून हात घालून त्या महिलेच्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र व काळ्या मण्यांची नकली चैन खेचून पोबारा केला. याबाबत महिलेने प्रथम पुणे लोहमार्ग पोलीस ठाणे येथे तक्रार दाखल केली होती. तेथून ही तक्रार खोपोली पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आली आहे. अधिक तपास सहाय्यक निरीक्षक आर कदम करीत आहेत.

# जमिनीच्या वादातून पाली येथील कृष्णा दिघे यांना जबर मारहाण

**पाली : प्रतिनिधी**

जमिनीच्या वादातून सुधागड तालुक्यातील वावळोली येथे मंगळवारी (दि. १४) सायंकाळी कृष्णा दिघे (वय ५०) यांच्यावर संजय फाळे (रा. वावळोली) व त्यांच्या मुलाने हाताबुक्क्याने मारहाण केली व कैचीने भोसकून जखमी केले आहे.




कृष्णा दिघे यांच्या वावळोली येथील जागेला लागून संजय फाळे यांची जागा आहे. या जागे संदर्भात दिघे व फाळे यांच्यात वाद सुरू आहेत. या जागेत संजय फाळे टपरी बांधण्याचे काम करत होते. यावेळी दिघे यांनी त्यांना या वादग्रस्त जागेत बांधकाम का करतो अशी विचारणा केली. याचा राग येऊन संजय फाळे यांनी कृष्णा दिघे यांना शिवीगाळ करून धक्काबुक्की केली. त्याचवेळी फाळे यांच्या मुलाने कृष्णा दिघे यांच्या पाठीत कैची भोसकून त्यांना पाईपवर ढकलले आणि दोघांनी दिघे यांना हाताबुक्क्याने मारहाण केली.

जखमी कृष्णा दिघे यांच्यावर पाली प्राथमिक आरोग्य केंद्रात उपचार करून अलिबाग येथील जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले. तेथून त्यांना कोपरखैरणे नवी मुंबई येथे खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी पाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, अधिक तपास हवालदार श्री. चव्हाण करत आहेत.

# ट्रान्सफॉर्मरमधील कॉइलची चोरी; नऊ जणांना अटक

**मुरूड : प्रतिनिधी**

तालुक्यातील महालोर गावाजवळ असणाऱ्या महावितरणच्या ट्रान्सफॉर्मरमधील तांब्याची कॉइल चोरी प्रकरणी नऊ आरोपींना पकडण्यात मुरूड पोलिसांना यश आले आहे.

मुरूड तालुक्यातील महालोर गावातील ट्रान्सफॉर्मरमधील सुमारे एक लाख ४५ हजार २०० रुपयांचा तांब्याची कॉइल व ऑइलची चोरी झाल्याची तक्रार महावितरणचे कनिष्ठ अभियंता विशाल इंगावले यांनी मुरूड पोलीस ठाण्यात दाखल केली होती.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पोलीस पथकाने या चोरी प्रकरणी सागर वाघमारे, अक्षय वाघमारे, दिलीप वाघमारे, अनिल वाघमारे, शशिकांत वाघमारे, दत्ता वाघमारे, संदिप पवार (सर्व रा. देवकान्हे आदिवासीवाडी, ता. रोहा), अक्षय वाघमारे व अभिषेक शेळके (रा. मणेर, ता. मुरुड) यांना ताब्यात घेऊन रोहा पोलीस ठाण्यात आणले. अधिक तपासात त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली. रोहा पोलिसांनी या आरोपींना मुरुड पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पुढील तपास हवालदार विलास आंबेतकर व युवराज निकाळे करीत आहेत.

# महाडमध्ये भाजपचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर



(छाया : महेश शिंदे)

**महाड : प्रतिनिधी**

जागतिक रक्तदान दिनानिमित्त महाड भाजपच्या वतीने महिलांसाठी हिमोग्लोबिन तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते. या वेळी महिलांच्या आरोग्याविषयी तज्ज्ञांनी मार्गदर्शनही केले.

जागतिक रक्तदान दिनाचे औचित्य साधून महाड भाजप महिला मोर्चा तर्फे बुधवारी शहरातील जनकल्याण रक्त केंद्रामध्ये महिलांचे हिमोग्लोबिन तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा शहरातील असंख्य महिलांनी लाभ घेतला.

भाजपचे जिल्हा सरचिटणीस बिपीन महामुणकर, जिल्हा चिटणीस डॉ. मंजुषा कुद्रीमोती, महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्ष नीलिमा भोसले, तालुकाध्यक्ष रश्मी वाझे, भाजपचे तालुका सरचिटणीस महेश शिंदे, शहर अध्यक्ष निलेश तळवटकर, नमीता दोशी, योजना दळवी, मीनल बुटाला यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

# कर्जतचे डॉ. नितीन आरेकर यांचा पुरस्काराने सन्मान

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण मराठी साहित्य परिषदेचा मानाचा कै. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक प्रतिष्ठान पुरस्कार रविवारी (दि. १२) पालघर येथे झालेल्या कोकण महिला साहित्य संमेलनात डॉ. नितिन आरेकर (रा. कर्जत) यांना देऊन गौरविण्यात आले.

साहित्य, पर्यावरण, शिक्षण आदी क्षेत्रांत योगदान देत असलेल्या ठाणे किंवा पालघर जिल्ह्यातील मान्यवरास हा पुरस्कार देण्यात येतो.

उल्हासनगर येथील महाविद्यालयात प्राध्यापक असलेले डॉ. नितिन आरेकर (रा. कर्जत) यांना पद्मश्री मधु मंगेश कर्णिक यांच्या हस्ते कोमसापचा कै. पद्मश्री भाऊसाहेब वर्तक प्रतिष्ठान पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. माजी खासदार अर्थतज्ज्ञ डॉ. भालचंद्र मुणगेकर, प्रख्यात लेखिका मोनिका गजेंद्रगडकर, कवयित्री नीरजा आदी या वेळी उपस्थित होत्या.



(छाया : विजय मांडे)

# अधिकाऱ्यांच्या पदांचा अभाव, कसा लागणार आरोग्याचा निभाव?

## म्हसळा ग्रामीण रुग्णालयात कर्मचाऱ्यांची वानवा

**म्हसळा : प्रतिनिधी**

येथील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे नव्याने भरली असली तरी रुग्णालयावर नियंत्रण असणारे वैद्यकिय अधीक्षक हे पद रिक्त आहे. त्यामुळे ग्रामिण रुग्णालयातून विविध दाखले लाभार्थींना मिळत नाहीत. त्यावरून लाभार्थी आणि कनिष्ठ सहाय्यक यांच्यात सातत्याने वाद होत असतात. कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे रुग्णांवरील उपचारात हेळसांड होत आहे. परिणामी म्हसळा ग्रामीण रुग्णालयात रुग्णांची 'उपचार नको पण दुवा दे' अशी परिस्थिती आहे.

रुग्णालयांत महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या अधिपरिचारिकांची तब्बल तीन पदे रिक्त आहेत. दोन कार्यालयीन कनिष्ठ लिपीक कार्यरत आहेत. त्यापैकी एक लिपीक सेवेवर तर दूसरा लिपीक कामगिरीवर असल्याचे सांगण्यात येते. या रुग्णालयातील एक क्ष किरण तंत्रज्ञ आणि एक प्रयोगशाळा सहाय्यक ही पदे तसेच कक्ष सेवक वर्ग ४ ची तब्बल तीन पदे रिक्त आहेत. हे ग्रामिण रुग्णालय सुरू होऊन आठ वर्षे झाली तरी रुग्णालयाला अधीक्षक मिळत नसल्याने कधी वैद्यकीय अधिकारी नसणे, कधी स्टाफ नसणे, त्यामुळे उर्वरीत परिचारिका व अन्य कर्मचाऱ्यांची रुग्णाना सेवा देण्यात तारांबळ होत असते, त्यामुळे रुग्ण सेवेची केविलवाणी स्थिती होते. प्रयोगशाळा सहाय्यक वर्ग ३ हे पद गेल्या आठ वर्षात भरलेच नाही, कक्षसेवकाची चार पदे असून त्यापैकी तीन पदे रिक्त आहेत. रुग्णालयासाठी आवश्यक असणारा डेटा एन्ट्री ऑपरेटर अद्यापही नाही. गोरगरीब रुग्ण आणि त्यांच्या नातलगांजवळ परिचारीका उद्धटपणे वागत असल्याच्या तक्रारी होत आहेत.

**म्हसळा ग्रामीण रुग्णालयात २४ तास सेवा मिळणे आवश्यक आहे. वैद्यकीय अधीक्षकाचे पद तत्काळ भरावे. रुग्णालयात कर्मचारीही असणे जरुरीचे आहे.**

**–महादेव पाटील, माजी सभापती, पंचायत समिती, म्हसळा**

# कौले चाळणाऱ्या कुशल मजुरांची कमतरता

- म्हसळ्यातील ७० टक्के घरे डागडुजीविना
- पावसाळ्याच्या तोंडावर ताडपत्रीचा पर्याय

**म्हसळा : संजय खांबेटे**

कौलारू घरांवरील कौलांची दरवर्षी एप्रिल–मे महिन्यांमध्ये स्वच्छता व डागडुजी केली जाते. त्यावेळी वर्षभरात फुटलेली, सरकलेली कौले आणि कोने नीट केले जातात, त्याला घर चाळणे किंवा शिवणे असे म्हणतात. मात्र कौले चाळणाऱ्या कुशल मजुरांची कमतरता भासत असल्याने म्हसळ्यातील ७० टक्के घरे या वर्षी चाळली गेली नाहीत.

सुमारे ३० वर्षापूर्वी म्हसळा शहर हे निर्सगाच्या कुशीतील कौलारू घरांचे गाव होते. मात्र आता म्हसळा शहरांत सुमारे २० ते ३० गृहनिर्माण प्रकल्प, सुमारे ३००ते ४०० आरसीसी घरे उभी राहिली आहेत. तसेच उर्वरीत घरांवर सिमेंट आणि पत्र्यांचे छप्पर दिसत असल्याचे चित्र आहे. तरीही जुन्या पद्धतीची कौलारू घरे अजूनही मोठ्या संख्येने आहेत. निर्सग आणि तोक्ते वादळांनंतर कौलारू घरांचे प्रमाण कमी होत गेले.





म्हसळा शहर तसेच तालुक्यातील बहुतांश गावात पूर्वी सर्वच घरे कौलारू होती. कौलारू छप्पर घरातील तापमान कमी करते, घरातील हवा सतत खेळती, थंड व शुद्ध रहाते. त्यामुळे कौलारू घरे आरोग्यासाठी उत्तम असल्याचा जाणकारांचा दावा आहे. म्हसळा शहराच्या मुख्य बाजारपेठेत पुर्वी फार मोठ्या प्रमाणात मंगलोरी कौले (बी.पिंटो, हातोडा छाप) मिळत असत. दरवर्षी पावसाळ्यापुर्वी कौलारू घरांवरील कौले चाळली जात असत. मात्र अलिकडच्या काळात कौले चाळणाऱ्या कुशल आणि अकुशल मजुरांची वाणवा भासू लागली आहे. तसेच बाजारांत उपलब्ध होणाऱ्या मंगलोरी आणि गुजरात बनावटीच्या कौलांचे प्रमाण खुप कमी झाले आहे. त्यामुळे त्यांचे दरही वधारले आहेत. हल्ली कौले १० रुपये तर कोने ७० प्रती नग या दराने बाजारांत उपलब्ध आहेत. कौले चाळणारे कुशल मजूर उपलब्ध होत नसल्यामुळे आजही म्हसळा शहरांतील ७० टक्के घरे चाळली किंवा दुरुस्त केली गेली नसल्याचे चित्र आहे. घरे चाळणाऱ्या कुशल मजुरांची प्रतीदिन मजूरी ८०० ते १००० रुपये आहे.

**कौलांची दुरुस्ती करण्यासाठी वारंवार खर्च करावा लागत असल्याने लोक कौले काढून छप्परावर मोठ्या प्रमाणावर सिमेंट किंवा लोखंडी पत्रे टाकतात. त्यात खर्च आणि वेळेची बचत होते.**

**–मनोज नाक्ती, ग्रामस्थ, तोंडसुरे, ता. म्हसळा**

**कौलारू घरांचे वारा, वादळाने मोठे नुकसान होते, म्हसळा तालुक्यात माकडांच्या उपद्रवाने कौले सातत्याने बदलावी लागतात. कौलारू घरांची वारंवार देखभाल, दुरुस्ती आर्थिक दृष्ट्या कठीण होते. घरमालकांना कौले चाळणाऱ्या कामगारांची मजुरी परवडत नसल्याने छप्परावर पत्रे टाकण्याकडे अधिक कल आहे.**

**–नंदू कुडतुडकर, कौले तज्ज्ञ कारागीर**

# कर्जतमध्ये शिवप्रेमींकडून रोपांचे वाटप

**कर्जत : बातमीदार**

शिवराज्यभिषेक दिनानिमित्ताने कर्जत चारफाटा येथे शिवप्रेमी तरुणांनी पादचारी आणि वाहनांतून प्रवास करणाऱ्यांना झाडांच्या रोपांचे मोफत वाटप केले. कर्जत येथील कृषी संशोधन केंद्राचे शिक्षण विस्तार शास्त्रज्ज्ञ डॉ. रवींद्र मर्दाने यांनी या उपक्रमाला शुभेच्छा दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या तिथीप्रमाणे येणाऱ्या राज्यभिषेक दिनानिमित्त शिवप्रेमी तरुणांनी कर्जत चारफाटा येथे वेगवेगळ्या तीस प्रकारच्या झाडांच्या रोपांनी भरलेला एक टेम्पो उभा केला. आणि रस्त्याने जाणारे पादचारी व वाहनांतून प्रवास करणाऱ्यांना झाडांची रोपे भेट दिली. या वेळी हेमंत नामदेव कोंडिलकर यांनी तयार केलेले सेंद्रिय खतदेखील मोफत वाटण्यात आले. या उपक्रमात निलेश गायकवाड, जिवक गायकवाड, संदेश काळभोर, हेमंत कोंडिलकर, ऋषिकेश भगत, विनोद भगत आदी शिवप्रेमी तरुणांनी सहभाग घेतला होता.



(छाया : संतोष पेरणे)

इंडोनेशिया बॅडमिंटन स्पर्धा

# प्रणॉयची उपांत्यपूर्व फेरीत धडक

**जकार्ता : वृत्तसंस्था**

भारताच्या थॉमस चषक विजेतेपदाचा एक नायक एचएस प्रणॉयने विजयी घोडदौड कायम राखत गुरुवारी इंडोनेशिया खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या उपांत्यपूर्व फेरीत धडक मारली.

पुरुष एकेरीत केरळच्या २९ वर्षीय प्रणॉयने आपला पाच वर्षांचा जेतेपदाचा दुष्काळ संपवण्याच्या इराद्याने हाँगकाँगच्या जागतिक क्रमवारीत १२व्या क्रमांकावरील एनजी का लाँग अँगचा २१-११, २१-१८ असा सरळ गेममध्ये पराभव केला. प्रणॉयचा हा लाँगवरील चौथा विजय ठरला.

समीर वर्मा तसेच अश्विनी पोनप्पा आणि एन. सिक्की रेड्डी जोडीचे आव्हान मात्र संपुष्टात आले. २७ वर्षीय समीरने जागतिक क्रमवारीत पाचव्या स्थानावरील मलेशियाच्या ली झि जियाकडून १०-२१, १३-२१ असा ४३ मिनिटांत पराभव पत्करला. आतापर्यंत जियाविरुद्ध झालेल्या सात सामन्यांपैकी समीरचा हा पाचवा पराभव ठरला.

महिला दुहेरीत अश्विनी आणि सिक्की जोडीची वाटचाल चीनच्या अग्रमानांकित चेन क्विंग चेन आणि जिया यि फॅन जोडीने १६-२१, १३-२१ अशा फरकाने संपुष्टात आणली. पुरुष दुहेरीत एमआर अर्जुन आणि ध्रुव कपिला जोडीने चीनच्या लिऊ यू चेन आणि ओऊ शुआन यि जोडीकडून १९-२१, १५-२१ अशी हार पत्करली.



## 'आयसीसी'च्या विशेष पंच श्रेणीत मेनन यांना पुन्हा स्थान

**राजकोट : वृत्तसंस्था**

भारताच्या नितीन मेनन यांनी आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) विशेष पंच श्रेणीतील (एलिट पॅनल) स्थान कायम राखले आहे. या महिन्यात श्रीलंकेमध्ये होणाऱ्या कसोटी मालिकेत त्यांना प्रथमच तटस्थ पंचांची भूमिका पार पाडण्याची संधी मिळेल.



इंदूरचे रहिवासी असलेले मेनन हे आयसीसीच्या ११ सदस्यीय विशेष पंच श्रेणीत स्थान मिळालेले एकमेव भारतीय आहेत. 'गेल्या तीन-चार वर्षांपासून भारताचे आघाडीचे पंच असलेले मेनन यांना आयसीसीने नुकतीच एका वर्षाची करारवाढ दिली आहे तसेच या महिन्याच्या अखेरीस त्यांना तटस्थ पंच म्हणून पदार्पणाची संधी मिळणार आहे,' असे भारतीय क्रिकेट नियामक मंडळाच्या (बीसीसीआय) अधिकाऱ्याकडून सांगण्यात आले.

# आयसीसी टी-२० क्रमवारीत ईशान किशनने मारली मुसंडी

**दुबई : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा सलामीवीर ईशान किशनने आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेच्या (आयसीसी) टी-ट्वेंटी क्रमवारीत ६८ स्थानांची झेप घेत सातव्या स्थानावर पोहचला आहे. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम हा टी-२० आणि एकदिवसीय फलंदाजांच्या क्रमवारीत पहिल्या स्थानावर आहे.

दक्षिण आफ्रिकेविरुद्ध सुरू असलेल्या टी-२० मालिकेत ईशान किशनने आतापर्यंत तीन सामन्यांमध्ये १६४ धावा केल्या आहेत. त्यामुळे तो टी-२० फलंदाजांच्या यादीत पहिल्या १०जणांच्या यादीमध्ये प्रवेश करू शकला. पहिल्या १० फलंदाजांमध्ये किशन हा एकमेव भारतीय फलंदाज आहे. त्याच्यापाठोपाठ केएल राहुल १४व्या स्थानावर आहे.



कर्णधार रोहित शर्मा आणि श्रेयस अय्यर यांची प्रत्येकी एका स्थानाने घसरण झाली असून ते अनुक्रमे १६व्या आणि १७व्या स्थानावर आहेत. माजी कर्णधार विराट कोहली दोन स्थानांनी घसरून २१व्या स्थानावर गेला आहे.

गोलंदाजी क्रमवारीमध्ये वेगवान गोलंदाज भुवनेश्वर कुमारची सात स्थानांनी सुधारणा झाली आहे. तो सध्या ११व्या स्थानावर पोहचला आहे. फिरकीपटू युझवेंद्र चहलने चार स्थानांनी प्रगती करीत २६वे स्थान मिळवले आहे. ऑस्ट्रेलियाच्या जोश हेझलवूडने टी २० गोलंदाजी पुन्हा पहिले स्थान पटकावले आहे.

कसोटी फलंदाजांच्या क्रमवारीत रोहित शर्मा आणि विराट कोहली अनुक्रमे सातव्या आणि दहाव्या स्थानावर आहेत, तर इंग्लंडच्या जो रूटने न्यूझीलंडविरुद्ध सलग दुसरे शतक झळकावून अव्वल स्थान पटकावले आहे. भारतीय वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराहने कसोटी गोलंदाजी क्रमवारीत तिसऱ्या स्थानावर झेप घेतली आहे. रविचंद्रन अश्विन दुसऱ्या स्थानावर कायम आहे. अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत रवींद्र जडेजा आणि अश्विन पहिल्या दोन स्थानांवर टिकून आहेत.

# नॉटिंगहॅम कसोटीत चौकार-षटकारांचा पाऊस

**नॉटिंगहॅम : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यातील कसोटी मालिकेतील दुसरा सामना नॉटिंगहॅममध्ये झाला. या सामन्यात इंग्लंडने न्यूझीलंडविरुद्ध ऐतिहासिक विजय नोंदवला. जॉनी बेअरस्टोच्या शतकाच्या जोरावर इंग्लंडने न्यूझीलंडवर पाच गडी राखून मात केली. या सामन्यात अनेक नवे विक्रम रचले गेले. नॉटिंगहॅम कसोटीत सीमारेषेपार गेलेल्या चेंडूंमधून एक हजाराहून अधिक धावा मिळाल्या.

या कसोटीत एकूण एक हजार ६७५ धावा झाल्या. याआधी इंग्लंडच्या मैदानावर खेळल्या गेलेल्या कोणत्याही कसोटी सामन्यात इतक्या धावा झाल्या नव्हत्या. कसोटी क्रिकेटमध्ये एकाच सामन्यात सर्वाधिक एक हजार ७२३ धावा करण्याचा विक्रम १९४८मध्ये इंग्लंड आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील सामन्यात झाला होता. त्यानंतर आता नॉटिंगहॅम कसोटीचा दुसरा क्रमांक लागत आहे.



एवढेच नाही तर कसोटी सामन्यात सर्वाधिक चौकार-षटकार मारण्याचा विक्रमही नॉटिंगहॅम कसोटी सामन्यात झाला. इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात झालेल्या सामन्यात एकूण २४७ वेळा (२२५ चौकार आणि २४ षटकार) चेंडू सीमारेषेपार गेला. न्यूझीलंडने पहिल्या डावात ८० चौकार आणि चार षटकार मारले, तर दुसऱ्या डावात ३६ चौकार आणि दोन षटकार मारले. यजमान इंग्लंडने पहिल्या डावात ७३ चौकार आणि सहा षटकार मारले, तर दुसऱ्या डावात ३६ चौकार आणि १२ षटकार मारले.

कसोटी क्रिकेटमधली अशी पहिलीच वेळ आहे. यापूर्वी २००४मध्ये ऑस्ट्रेलिया आणि भारत यांच्यातील सिडनी कसोटीत सर्वाधिक ९७६ धावा चौकार-षटकारांच्या मदतीने मिळाल्या होत्या.

# दुखापतीमुळे राहुल इंग्लंड दौऱ्यातून 'आऊट'

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय कसोटी संघातील काही खेळाडू इंग्लंड दौऱ्यावर रवाना झाले आहेत. उर्वरित खेळाडूदेखील लवकरच इंग्लंडला जाणार आहेत, मात्र सलामीवीर आणि कसोटी संघाचा उपकर्णधार केएल राहुल दुखापतीमुळे इंग्लंड दौऱ्यातून बाहेर पडला आहे. भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) केएल राहुलला उपचारासाठी परदेशात पाठवण्याचा निर्णय घेतला आहे. त्याला जर्मनीला पाठवण्याची तयारी केली जात असल्याचे वृत्त आहे.



## उपचारासाठी जाणार परदेशात

भारतीय क्रिकेट संघाला इंग्लंड दौऱ्यावर एकूण सात सामने खेळायचे आहेत. इंग्लंडमध्ये भारतीय संघ १ ते ५ जुलैदरम्यान एक कसोटी सामना खेळणार आहे. त्यानंतर तीन टी २० आणि तीन एकदिवसीय सामने होणार आहेत. इंग्लंड दौऱ्यासाठी रोहित शर्माला भारतीय संघाचा कर्णधार आणि केएल राहुलला उपकर्णधार करण्यात आले होते, मात्र दुखापतीमुळे राहुल इंग्लंड दौऱ्यासाठी उपलब्ध होणार नाही. त्यामुळे आता त्याच्या अनुपस्थितीत भारतीय निवड समितीला उपकर्णधारपदासाठी दुसऱ्या नावाचा विचार करावा लागणार आहे.

'क्रिकबझ'ने प्रसिद्ध केलेल्या वृत्तानुसार, भारतीय क्रिकेट नियामक मंडळाने (बीसीसीआय) केएल राहुलला उपचारासाठी परदेशात पाठवण्याचा विचार केला आहे. क्रिकबझने बीसीसीआयचे सचिव जय शाह यांच्या हवाल्याने म्हटले आहे की, 'हे खरे आहे. बोर्ड त्याच्या फिटनेसवर काम करत आहे. तो लवकरच जर्मनीला जाणार आहे.' राहुल या महिन्याच्या अखेरीस किंवा जुलैच्या सुरुवातीला जर्मनीला जाण्याची शक्यता आहे.

# यशस्वी जैस्वालची ऐतिहासिक कामगिरी

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीच्या सामन्यात मुंबईने पहिल्या डावाच्या आघाडीच्या जोरावर उत्तर प्रदेशला बॅकफूटवर फेकले आहे. मुंबईच्या दुसऱ्या डावात कर्णधार पृथ्वी शॉ याने विक्रमी कामगिरी केल्यानंतर यशस्वी जैस्वालने चौथ्या दिवशी ऐतिहासिक पराक्रम केला. ५४ चेंडू खेळल्यानंतर पहिली धाव घेणाऱ्या यशस्वीने चौथ्या दिवशी १५०+ धावा केल्या आहेत. त्याची ही कामगिरी त्याला एसएम कादरी, दत्तू फडकर, सचिन तेंडुलकर, रोहित शर्मा, अजिंक्य रहाणे आदी दिग्गजांच्या पंक्तित नेऊन बसवणारी ठरली.



हार्दिक तामोरे (११५) व यशस्वी (१००) यांच्या शतकाच्या जोरावर मुंबईने पहिल्या डावात ३९३ धावा केल्या. शाम्स मुलानी (५०), सर्फराज खान (४०), सुवेध पारकर (३२) व तनुष कोटियन (२२) यांनी धावसंख्येत हातभार लावला. प्रत्युत्तरात उत्तर प्रदेशच्या फलंदाजांना अपयश आले. तुषार देशपांडे, मोहित अवस्थी व कोटियन यांनी प्रत्येकी तीन विकेट्स घेताना उत्तर प्रदेशला १८० धावांत गुंडाळले. दुसऱ्या डावात मुंबईसाठी कर्णधार पृथ्वीने ७१ चेंडूंत १२ चौकारांसह ६४ धावा केल्या. मुंबईच्या फलकावर ६६ धावांपैकी ६४ पृथ्वीच्या होत्या. नॉन स्ट्राईकला असलेल्या यशस्वीने ५४ चेंडूंनंतर पहिली धाव घेतली.

यशस्वी व अरमान जाफर यांनी चौथ्या दिवशी दुसऱ्या विकेटसाठी विक्रमी २८६ धावांची भागीदारी केली. अरमान २५९ चेंडूंत १५ चौकार व दोन षटकारांसह १२७ धावांवर बाद झाला. यशस्वीनेही शतक झळकावले. त्याने पहिल्या डावातही शतकी खेळी केली होती आणि मुंबईकडून रणजी करंडकात दोन्ही डावांत शतक झळकावणारा तो नववा फलंदाज ठरला आहे. यशस्वीची खेळी अखेर १८१ धावांवर संपुष्टात आली.





पनवेल : श्री समर्थ सद्‌गुरूनाथदादा महाराज पुण्यतिथी सप्ताहाचे आयोजन न्हावाखाडी येथील हनुमान मंदिरात करण्यात आले आहे. या ठिकाणी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी भेट देऊन दर्शन घेतले. तीन गावांना जलवाहिनी तसेच पाण्याची टाकी दिल्याबद्दल लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा या वेळी बाळासाहेब महाराज नंदेश्वर (मंगळवेढा) यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. सोबत भाजपचे अरुणशेठ ठाकूर, सी. एल. ठाकूर, मदन ठाकूर, सुरेश ठाकूर, माजी नगरसेविका कल्पना ठाकूर, अनंता ठाकूर, जयवंत ठाकूर यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते व ग्रामस्थ होते.

# पृथ्वी शॉने मोडला १३४ वर्षे जुना विक्रम

**मुंबई : प्रतिनिधी**

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या उपांत्य फेरीत मुंबईने तिसऱ्या दिवसअखेर मोठी आघाडी घेतली आहे. मुंबईच्या पहिल्या डावातील ३९३ धावांच्या प्रत्युत्तरात उत्तर प्रदेशचा डाव १८० धावांवर गडगडला. पहिल्या डावातील २१३ धावांच्या आघाडीत मुंबईने झटपट धावा जोडण्याचा प्रयत्न केला. कर्णधार पृथ्वी शॉ व यशस्वी जैस्वालने डावाची सुरुवात केली. पृथ्वीने या सामन्यात प्रथम श्रेणी क्रिकेटमधील १३४ वर्षांपूर्वीचा विक्रम मोडला.



दुसऱ्या डावात मुंबईसाठी कर्णधार पृथ्वीने आक्रमक सुरुवात केली. त्याने ७१ चेंडूंत १२ चौकारांसह ६४ धावांची खेळी केली. मुंबईच्या फलकावर ६६ धावांपैकी ६४ धावा या पृथ्वीच्या होत्या. दोन धावा या लेग बायने आल्या होत्या. नॉन स्ट्राईकला असलेल्या यशस्वीने ५४ चेंडूंनंतर पहिली धाव घेतली.

६६ धावांच्या भागीदारीत पृथ्वीने ९६.९६ टक्क्यांचा वाटा उचलला आणि प्रथम श्रेणी क्रिकेटमध्ये अर्धशतकी भागीदारीत उचललेला ही सर्वाधिक टक्केवारी ठरली. १८८८मध्ये ऑस्ट्रेलियाच्या पर्सी मॅकडोनेल व ॲलेक्स बॅनेर्मन यांनी ऑस्ट्रेलियन्स वि. नॉर्थ या लढतीत ८६ धावांची भागीदारी केली होती. त्यात मॅकडोनेलने ८२ धावा करून ९५.३४ टक्के वाटा उचलला होता.

# आणखी एका सायकलपटूने केले प्रशिक्षक शर्मांवर आरोप

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

काही दिवसांपूर्वी एका अव्वल भारतीय महिला सायकलपटूने राष्ट्रीय प्रशिक्षक आरके शर्मा यांच्यावर लैंगिक छळाचे गंभीर आरोप लावले होते. त्यानंतर शर्मांच्या अचडणींमध्ये आणखी वाढ होताना दिसत आहे. आता एका महिला सायकलपटूनेदेखील शर्मांच्याविरोधात तक्रार केली आहे. 'प्रशिक्षक शर्मांनी आपल्याला दोनदा मारहाण केली होती. एवढेच नाही तर मी समलैंगिक असल्याचा आरोपही केला होता', असे या सायकलपटूने म्हटले आहे.

सध्याची राष्ट्रीय चॅम्पियन आणि आंतरराष्ट्रीय सुवर्णपदक विजेती डेबोरा हेरोल्डने एका वृत्तपत्राशी बोलताना दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, तिला जाणीवपूर्वक राष्ट्रीय संघातून वगळण्यात आले होते, कारण आरके शर्मा आणि त्यांची सहाय्यक गौतमणी देवी यांना डेबोरा समलैंगिक नात्यामध्ये असल्याचा संशय होता. डेबोराशिवाय आणखी दोन सायकलपटूंनीदेखील सांगितले की, त्यांनी भारतीय क्रीडा प्राधिकरणाच्या अंतर्गत तक्रार समितीकडे आरके शर्मा आणि गौतमणी देवीविरोधातक्रार दाखल केली आहे. ते दोघे महिला खेळाडूंना सतत धमकावत आहेत. त्यामुळे खेळाडूंच्या कामगिरीवर परिणाम होत आहे.

डेबोरा हेरोल्ड २०१२पासून भारतीय सायकलपटू संघाचा भाग आहे. ती २०१४पासून आरके शर्मा यांच्याकडून प्रशिक्षण घेत आहे. तिने दिलेल्या माहितीनुसार, २०० मीटर स्प्रिंट आणि ५०० मीटर टाइम ट्रायल इव्हेंटमध्ये देशातील सर्वात वेगवान सायकलपटू असूनही २०१८ ते २०१९च्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धेत तिला संघाबाहेर ठेवण्यात आले होते. डेबोरा म्हणाली, गौतमणी देवीला वाटले की मी एका सहकारी महिला सायकलपटूसोबत रिलेशनशिपमध्ये आहे. त्यांनी मला खूप त्रास दिला. माझ्याकडे दुर्लक्ष केले आणि बाकीच्या सायकलपटूंपासून मला वेगळे केले. शेवटी राष्ट्रीय शिबिरातूनही बाहेर काढण्यात आले, पण प्रत्यक्षात मी समलैंगिक नाही. आमची फक्त चांगली मैत्री आहे.




हे दैनिक मल्हार नेटवर्क प्रा. लि. च्या वतीने कृष्णा चांगु ठाकुर यांनी सिद्धकला प्रिंट मिडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., ॲट प्लॉट नं. डब्ल्यू-२३०, टी.टी. सी. इंडस्ट्रियल एरिया, खैरणे एम.आय.डी.सी., ठाणे-बेलापूर रोड, नवी मुंबई -४००७१०, ठाणे जिल्हा, महाराष्ट्र येथे मुद्रीत करून शॉप नं. ४, ॲस्पायर प्राईड, प्लॉट नं. २२७, निअर रुपाली सिनेमा, पनवेल, जिल्हा - रायगड, पिन - ४१०२०६, महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. ✲ संपादक : देवदास लक्ष्मण मटाले ✲ E-mail : ramprahar@gmail.com ✲ RNI Regn. No. MAH MAR/2008/26534.

"Printed and Published by **Krishna Changu Thakur** on behalf of **Malhar Network Pvt. Ltd.** and Printed at **Siddhakala Print Media and Publications Pvt Ltd. Plot No. W 230, T. T. C. Industrial Area, Khairne MIDC, Thane Belapur Road, Navi Mumbai - 400 710, Thane Dist, Maharashtra** and published from **Shop No. 04, Aspire Pride, Rupali Cowk, Panvel, Navi, Mumbai 410 206, Panvel, Raigarh- 410206, Maharashtra. RNI Regd. No. MAHMAR/2008/26534, Editor : Devdas Laxman Matale**